नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

मूल्य : १ रु.

युगवाणी

कै. कविवर्य 'नागेश' ऊर्फ नागेश गणेशशास्त्री नवरे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

महाप्रयाण.................

कविता ....

कविवर्य नागेश यांना श्रद्धांजली ....

कट्यार , घोडा, पताका आणि पणूर् ....

‘टक टक टक ......खर्र खर्र.... टक टक ....

अश्रू ....

महिमा (काळाचा?) ....

श्रीधरचे काव्यविषयक विचार ....

प्राचीन भारतीय चित्रण आणि साहित्यिक उल्लेख ....

‘मधुमधुरा तव गिरा’ : कै. बालगंधर्व ....

मराठीचे पाठ्यपुस्तके.............

पुस्तक परीक्षण ....

संपादकीय ....

संघवार्ता ....

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ

महत्त्वाची सूचना

१९६७–६८ साली विदर्भ साहित्य संघाची निवडणूक आहे. दि. १५–१०–१९६७ पर्यंत सभासद होणारासच मताधिकार राहील. तत्पूर्वी १९६७–६८ सालची वर्गणी दि. १–१०–१९६७ पर्यंत केंद्रीय कार्यालयात जमा झाली पाहिजे. कारण दि. १५–१०–१९६७ पर्यंत सर्व सभासदांची नोंद होऊन सर्व सभासदांचा आकडा दि. १५–१०–१९६७ या दिवशी जाहीर करावयाचा असतो. म्हणून दि. १–१०–१९६७ ला पावत्या आणि वर्गणीची रक्कम ही दोन्ही केंद्रीय कार्यालयात जमा होणे अत्यंत आवश्यक आहे. केवळ आवेदन पत्रे किंवा सभासद नोंदविल्याची यादी केंद्रीय कार्यालयात पाठविली तर सभासदांची नोंद करता येणार नाही. (हे सभासद दि. १५–१०–१९६७ चे आहेत हे विचारात घेता येणार नाही). तरी सर्व प्रचारकांनी याची दखल घ्यावी ही विनंती.

दि. १–८–१९६७

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ-पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

यु ग वा णी

संपादक :
मा. नी. गलगलीकर

संपादक मंडळ

श्री. बाळासाहेब ढवळे · श्री. वसंत वऱ्हाडपांडे
सा. भू. तु. ना. काटकर · श्री. श्रीकान्त राय
श्री. व्यं. नी. पंडित · प्रा. पुंडरीक धुमाळे

वर्ष २२] ऑगस्ट १९६७ [अंक ४

महाप्रयाण

जेव्हा अश्रू शब्दरूप होतात
गळ्यात गहिंवरत भरून आलेले हुंदक्यांचे आभाळ ओलांडून
आणि चिरंतनाच्या प्रतिध्वनींचे अर्घ्य टपटपते आत्म्याच्या अश्वत्थावरून
माहेरी परतलेले असते दुःख
क्रूसावरून ठिबकणाऱ्या रक्तथेंबांना वाट विचारीत
मात्र इंद्रायणीस वाहणे भाग असते उदरात अभंगांचा गर्भ वागवीत
उल्कांची अटळ निखळण आभाळास असते ठाऊक
म्हणूनच चंद्राला चंद्रपण सोडता येत नाही !
तरीहि आपण कासावीस होत असतो जळावेगळ्या मासोळीसारखे
मर्यादा अमर्याद व्हावी इतके बळ नसते आपल्याजवळ म्हणून
मग गीतोपनिषदांच्या सावल्यामधून पुटपुटत येते ज्योतिर्मय तत्वज्ञान
आपल्या करुणामय करांनी आम्हा अजाणांची आसवे पुसण्यास
जेव्हा शब्द अश्रूरूप होतात
आणि गळ्यात गहिंवरत भरून आलेले
हुंदक्यांचे आभाळ अर्घ्यावर फाटते !

—उ. रा. गिरी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कविता

करंटा—

आंधळ्याच्या वाटा
वळणाशी आल्या
अगा सोकावल्या
—उजेडास

किती वळतील
आकारल्या खुणा
चालत्याचा धाणा
—चाचपून

डोळसाचे जग
डोळस न जाणे
आंधळ्याचे कोणे ?
—शोधी कोण ?

हाकेवर त्याच्या
सदा वरवटा
कपाळ करंटा
—होई जन्म

—कल्याण इनामदार

आकांक्षा

अस्फुटतेच्या
अंतरातल्या
हुंकाराला—शब्द हवा

शब्दांमधल्या
अनुभूतींचा
आशयतेला—भाव हवा

तसाच मजला
जीवन जगता
तव अश्रूंचा—हात हवा.

—वि. भा. नेमाडे

चावी देऊन ठेवली आहे
म्हणून टिक्टिक् चालू आहे
काटे गळून पडले आहेत
कळाहीन काळाचा श्वासउच्छ्वास ऊर्ध्व आहे
अंत:करण नसलेले जगावर प्रेम करताहेत
आणिक डोके नसलेले राज्य करू म्हणताहेत.
डोळ्यांच्या बाहुल्या स्तब्ध बघताहेत.
विनाशाच्या गर्तेचा मार्ग सुकर झाला आहे
निखिल विश्वसंहाराचे प्रयोजन आयोजन झाले आहे
ब्रह्मार्पणं ब्रह्म हविः हा त्याचा मंत्र आहे:
आणि त्यातच आहुति आहे
होत्याची.
म्हणतात म्हणतात
आता दुनिया येणार आहे
नव्हत्यांची.
त्याचसाठी झगडा आहे.
निवाडा होऊन चुकला आहे.
चावी देऊन ठेवली आहे
टिकटिक टिकटिक चालू आहे
काटे गळून पडले आहेत
कळाहीन काळाचा श्वासउच्छ्वास ऊर्ध्व आहे.

—'यक्ष'

बंदीश....!

हुंदक्याच्या तालावरली थयथय तालबद्ध बंदीश
गिरकीतून निर्माण झालेली चिमुकल्या पिसांची पानगळ..

डोळ्यांची ढवळाढवळ रुतून बसलेली आरपार गच्च
घोटून घोटून गुळगुळीत झाले नाणे मनाच्या ओंजळीत...

अमलीन।ऊर सक्त मौन कैदेतच आहेत अजून डांबून
मंतरलेली अंधारगुहा भेसूर झालीय तेजाब पिऊन...

आता मुक्तीचे तूच टाक लालचुट्ट पाऊल पहिले वहिले
वासनांचे काफिले छम्छम् घुंगरू आभाळ प्याले...!

—राजा मुकुंद

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कविवर्य नागेश यांना श्रध्दांजली

—भवानीशंकर पंडित

व्यापारी जन आदोरत असली लेणी;–मदीयांतरी आहे ती रुचिरा निसर्गमधुरा नागेशवागीश्वरी.–Bee.

गोविंदाग्रज, बालकवी व रेंदाळकर यांचे समवयस्क कवी नागेश गणेशशास्त्री नवरे हे वयाच्या ऐंशीव्या वर्षी, कोकणात राजापूर जवळच्या हर्डी या आडवळणाच्या खेडेगावी मंगळवार दिनांक सहा जून एकोणिसशे सदुसष्टला दुपारी पावणे तीन वाजता दिवंगत झाले. त्यांच्या निधनाने एकोणिसशे वीसच्या सुमारातील जुन्या पिढीतला शेवटचा दुवा निखळला आहे. नागेशांना दीर्घायुष्य लाभले होते. परंतु एकोणिसशे चव्वेचाळिसात सेवानिवृत्त होऊन ते गेली तेवीस वर्षे त्यांच्या घराण्याच्या वर उल्लेखिलेल्या मूळ ग्रामी जाऊन राहिल्यामुळे, आजच्या पिढीला त्यांची असावी तितकी माहिती नाही. मासिक मनोरंजन आणि विविधज्ञानविस्तार या प्रमाणित मासिकात ज्या काळी रेव्हरंड टिळक, बी, गोविंदाग्रज, बालकवी आणि रेंदाळकर या नामवंत कवींच्या कविता प्रसिद्ध होत होत्या, त्याच काळी त्यांच्या बरोबरीने नागेशांच्या कवितांना जागा मिळत होती. फेब्रुवारी एकोणिसशे तेराच्या मासिक मनोरंजनात ‘माझी कविता’ ही नागेशांची कविता आली होती. टीकाकारांच्या प्रतिकूल टीकांमुळे विषण्ण झालेल्या नागेशांचे मन प्रफुल्ल व्हावे म्हणून कविश्रेष्ठ बींनी एप्रिल एकोणिसशे तेराच्या विविधज्ञानविस्तारात ‘नागेश’ ही कविता लिहिली होती. वर मथळ्याखाली दिलेल्या ओळी त्याच कवितेतील आहेत. त्यांवरून नागेशांच्या कवितेला त्यांचे नावाजलेले समकालीन कविमित्र किती मान देत हे लक्षात येईल.

नागेशांचा जन्म हर्डी येथे अठराशे सत्यांशीच्या नागपंचमीस झाला. त्यामुळे ‘नागेश’ असे त्यांचे नामकरण करण्यात आले. तेच नाव त्यांनी कवितेत धारण केले. त्यांचे घराणे परंपरागत शास्त्र्यांचे होते. त्यांच्या वडिलांच्या नावापुढे ‘शास्त्री’ हे उपपद योजण्यात येत असे. तेव्हा साहजिकच नागेशांचे विद्याध्ययन संस्कृत पाठशाळेत झाले. या संस्कारामुळे त्यांची कविता संस्कृत वळणावर गेली आहे. नागेशांच्या बालपणीच वडील निवर्तल्यामुळे शिक्षण पूर्ण होताच त्यांना पोटापाण्यासाठी कोल्हापूर येथील निरनिराळ्या शिक्षणसंस्थांत संस्कृत भाषा आणि साहित्य यांच्या अध्यापनाचे कार्य करावे लागले. कोल्हापुरास न्यू एज्युकेशन सोसायटीने चालवलेल्या न्यू स्कूलमध्ये ते अनेक वर्षे अध्यापक होते; आणि काही काळ त्या संस्थेचे सहकार्यवाह होते. कोल्हापुरास असतानाच एकोणिसशे दहाच्या सुमारास रेंदाळकरांचा आणि त्यांचा स्नेहसंबंध जुळला. पुढे रेंदाळकर व्यवसायानिमित्त पुण्यामुंबईकडे गेले, तरी तो कायम राहिला. रेंदाळकरांच्या पहिल्या भेटीविषयी ते सांगतात;– “एकोणिसशे दहाच्या सुरुवातीस मी धंद्यानिमित्त कोल्हापुरास आलो. तत्पूर्वी रेंदाळकरांविषयी मला काहीच माहिती नव्हती. पुढे थोड्याच दिवसांनी, त्यावेळी अस्तित्वात असलेल्या ‘विजयी मराठा’ नामक छापखान्यात ‘धर्मविचाराची मुद्रिते शुद्ध करीत असलेले रेंदाळकर मला अभावितपणे पहावयास मिळाले ! त्यांचे जिवंत बुद्धिमत्तेचे दर्शक भव्य कपाळ, पाणीदार डोळे, प्रमाणबद्ध निरोगी शरीरयष्टि आणि अत्यंत सफाईदार भाषा, या सर्व गुणसमुच्चयाचा त्यांच्या पहिल्याच

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भेटीत माझ्या मनावर जो अत्यंत अनुकूल परिणाम झाला, तो मी केंव्हाहि विसरणार नाही."* आणि रेंदाळकरांच्या मृत्यूनंतर 'काव्यचर्चे'त अनंततनयांनी रेंदाळकरांच्या कवितेची समीक्षा करताना त्यांच्या शीलावर शितोडे उडविले. त्या समीक्षेचा 'समाचार' घेताना ते संतापाने विचारतात;– "रेंदाळकर माझे जिव्हाळ्याचे स्नेही होते, हे मला कबूल आहे. परंतु त्यामुळे, त्यांच्या सूक्तासूक्त वर्तनक्रमाचे समर्थन करावयाचे, अशी अंधवृत्ति माझ्या वाट्यास आलेली नाही. परंतु, ज्याला सुपारीच्या खांडाचेहि मरेतोंपर्यंत व्यसन नव्हते, त्या रेंदाळकरांवर त्यांच्या मरणानंतर एकाद्या चंचीवहाद्दराने वाटतील तसले खोटेनाटे आक्षेप घेतलेले पाहून अंतःकरण तळतळल्याशिवाय कसे राहील?"† यांवरून त्यांचा रेंदाळकरांशी असलेला स्नेहसंबंध किती जिव्हाळ्याचा होता याची कल्पना येईल.

रेंदाळकरांच्या पश्चात् नागेशांचा माधव ज्यूलियन, प्राध्यापक ना. सी. फडके, गोविंदराव टेंबे इत्यादी कोल्हापुरातील साहित्यिकांशी स्नेह होता.

तीन वर्षांपूर्वी 'विदर्भ मराठवाडा बुक कंपनी' साठी मी 'उघडि नयन' या रेंदाळकरांच्या निवडक कवितांच्या संग्रहाचे संपादन केले. त्यावेळी मला नागेशांशी पत्रव्यवहार करण्याचा योग आला. दिनांक तेरा फेब्रुवारी एकोणिसशे चौसष्ट ते दिनांक एकोणिस सप्टेंबर एकोणिसशे पासष्ट या अवधीत मला त्यांची एकूण तीन पत्रे व अकरा कार्डे आली. ती सर्व माझ्या संग्रही सुरक्षित आहेत. त्या पत्रव्यवहारातील आवश्यक तेवढे अंश येथे संकलित करतो. म्हणजे साहित्याच्या अभ्यासकांना नागेशांच्या स्वभावाची आणि त्यांच्या समसामयिक साहित्यिकांची पुष्कळ नवीन माहिती मिळेल. हा पत्रव्यवहार तीन वर्षांपूर्वीचा आहे. यावेळी नागेश वार्धक्याने खंगले होते. परंतु त्यांचे मन मात्र ताजेतवाने होते.

---

* मासिक मनोरंजन. जानेवारी १९२१; आणि रत्नाकर फेब्रुवारी १९२८.

† रत्नाकर, एप्रिल १९२८.

स्वतःसंबंधी

"मी अलीकडे तब्बल आठ वर्षे वातविकाराने जागेवर पडून आहे. घरच्या घरात मोठ्या जिकीरीने फिरत असतो. त्यामुळे कोणतेही काम वेळेवर करणे जमत नाही. काही लिहावयाचे झाल्यास आरामखुर्चीत पडतो, ढोपराचे टेबल करून त्यावर पॅड धरतो नी मग लिहितो. हेही पत्र तसेच लिहीत आहे. तरी उशीराबद्दल तुम्ही मला उदार मनाने क्षमा करावी. कै. रेंदाळकरांच्या निवडक कवितांच्या संग्रहाच्या संपादनाच्या संदर्भात तुम्ही कै. रेंदाळकरांची काही पत्रे मजजवळ असल्यास मागितली आहेत. मजजवळ त्यांची बरीचशी पत्रे होती नी ती मी जतन करून मित्रस्मारक म्हणून ठेवली होती. ती अनवधानाने एके दिवशी वाळवीच्या भक्ष्यस्थानी पडली! फार दुःख झाले. पण त्याचा काहीच उपयोग नव्हता. आज या पत्रासोबत एक कार्ड व एक पाकीट अशी दोन पत्रे शोधताना मिळाली, ती तुमच्या सेवेस पाठवीत आहे. काही उपयोग झाल्यास करावा. कै. आजगांवकरांच्या 'ज्ञानांजनां'त आम्हा काही कवींवर टीकालेख आले आहेत असे त्यावेळी मी ऐकले होते. पण ते टीका वाङ्मय अखेरपर्यंत मला वाचावयास मिळाले नाही, व ते वाचावे अशी त्यावेळी फारशी उत्सुकता नव्हती."

कविश्रेष्ठ 'बीं' विषयी

'बी' कवींचा मला परिचय होता का असा तुम्ही प्रश्न केला आहे. त्यास सकृद्दर्शनी उत्तर द्यावयाचे झाल्यास 'नव्हता' असे द्यावे लागेल. मी त्यांना अखेरपर्यंत पाहिले नाही. त्यांच्या काव्यसंग्रहात प्रसिद्ध झालेला त्यांचा फोटो मात्र पाहिला आहे. असे जरी असले, तरी त्यांचा माझा आंतरिक संबंध मात्र अत्यंत घनिष्ठ होता. त्यांच्या कवितेवर मी माळून गेलो होतो व अजूनही आहे हे मी मोठ्या आनंदाने कबूल करतो. त्यांची 'चाफा' कविता मला फारच आवडली होती! फार काय, त्यांचे कोणतेही काव्याक्षर मला अक्षरवाङ्मय वाटत होते व अजून वाटते. असा स्ववैशिष्ठ्यपूर्ण कवी अलीकडे झाला नाही असे माझे ठाम मत आहे. त्यांच्या काव्यवैभवाने मोहरून जाऊन त्यांच्यावर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मी एक कविता लिहिली. तिचे नाव 'मधमाशी' ती त्यावेळी 'मनोरंजना'त* प्रसिद्ध झाली आहे. तीत मी मधमाशीची खूप भलावणी केली आहे. ती कविता वाचनात आल्यावर 'बीं' नी 'नागेश' शीर्षकाखाली 'विविधज्ञानविस्तारा'त आपली कविता प्रसिद्ध केली नी मला आशीर्वाद देऊन गौरविले. नाही तर त्यांच्या उज्ज्वल प्रतिभेपुढे माझ्या घुंगुरटचाची कसली मातब्बरी ? परगुणपरमाणूंना पर्वताचे स्वरूप आणून देणाऱ्या या थोर व्यक्ती ! माझी योग्यता मी जाणून होतो. या कवितेबद्दल पत्र पाठवून आभार मानण्यासही मी धजलो नाही, इतके हे व्यक्तिमत्त्व मला 'भारी' वाटले. तुम्हाला आश्चर्य वाटेल. 'बीं'च्या बाबतीत आणखी एक गोष्ट मोका आला म्हणून सांगावीशी वाटते. त्यांची एक कविता आहे. तिचे शीर्षक हे लिहीत असता स्मरेना.† पण त्या कवितेत दिंडी वृत्तात खालील चार ओळी आहेत—

दिव्य गंगा तीरस्थ वल्लरीला
मुकुल आले त्या एक निर्मलेला ।
वाहुनी ते मद्भाग्य मारुताने
दिले येथे आणून कौतुकाने ।।

या दिंडीचा थोडा इतिहास आहे. 'गंगा' हा शब्द मला फार प्रिय आहे. माझ्या आरंभीच्या प्रत्येक कवितेत कोठे ना कोठे तरी 'गंगा' हा शब्द आलेला आहे. आता वरील दिंडी वाचा. तिचे विवरण मी करीत नाही. 'बी' परत न येण्याकरिता गेले नी मी ढसाढसा रडलो ! पण त्यांचे एक अक्षरही माझ्या संग्रही नाही. आश्चर्य आहे की नाही ? 'बी' माझी कविता अशी टिपीत होते व मला आशीर्वाद देत होते."

गोविंदाग्रजांबाबत

"गडकऱ्यांचा व माझा दृढ परिचय होता. पण स्नेह बेताचा होता. महाराष्ट्र नाटक मंडळीसह ते कोल्हापुरास एक दोन वेळा आले होते. त्यावेळी बरेच वेळा माझ्या बिऱ्हाडी आले होते. अत्यंत बुद्धिमान गृहस्थ. असे त्यांच्या विषयी माझे मत आहे. ते अत्यंत लहरीही होते. पण ती लहर दुसऱ्याला तापदायक होत नसे. मला वाटते, एकोणिसशे चवदा किंवा पंधरा झाली. आम्ही काही मनोरंजनाचे लेखक व कवी नाताळात मुंबईत एकत्र आलो होतो. त्यांची नावेच सांगतो. गुर्जर, गडकरी, ठोमरे, काणेकर, परळकर, ठेंगे, कोल्हटकर, श्री. कृ. रेंदाळकर हे ते गृहस्थ होत. गडकऱ्यांच्या प्रेरणेने आमचा एक ग्रुपफोटो कै. मित्रांनी तारापोरवाल्याकडून त्यावेळी काढून घेतला होता. तो पुढे मनोरंजनात त्याच सुमारास प्रसिद्धही झाला. एकोणिसशे चव्वेचाळीसपर्यंत त्याची डबल फुलसाइझची प्रत मजजवळ होती. त्यानंतर ती कोल्हापुरी एका स्नेह्यांच्या घरी ठेवली. ती हल्ली आहे की नाही याचा शोध घ्यावा लागेल."

विठ्ठल सीताराम गुर्जर यांच्या संदर्भात

"गुर्जर माझे जिव्हाळ्याचे स्नेही होते. ते एकोणिसशे वीस साली आपल्या गावी कशेळी येथे रहावयास गेले. पण त्यांची दरवर्षी मुंबईस एक खेप होत असे. जाताना कधी एकटे तर कधी सपत्नीक असे कोल्हापुरी चार दिवस माझ्या बिऱ्हाडी राहून पुढे जात असत. नव्या गोष्टी, नव्या कादंबऱ्या अगोदर शक्य तर ते मजकडे पाठवीत, मला त्या आवडल्या की नाही याची मनःपूर्वक दखल घेत नी मग प्रकाशकाच्या स्वाधीन करीत. अखेरपर्यंत यात अंतर पडले नाही. मी कोल्हापूर सोडून चव्वेचाळीस साली येथे आलो, तरी या क्रमात अंतर पडले नाही. वर्षातून ते तरी येत किंवा मला तरी आपल्या घरी बोलावून घेत. त्यांच्या पत्नीचेहि संबंध आमच्या साऱ्या घरच्या मंडळीशी अत्यंत आपुलकीचे आहेत. गुर्जर कैलासवासी झाल्यावर थोडच्या अवधीने माझ्या अगत्याच्या बोलावण्यास मान देऊन त्या आमच्या घरी आठ दिवस येऊन राहिल्या होत्या. हल्ली त्या पुणे येथे आपल्या भावाच्या घरी राहिल्या असून गुर्जरांनी त्या सुस्थितीत राहतील अशी पैशांची व्यवस्था केली आहे."

* डिसेंबर १९१२ चा अंक पहा. 'बीं'नी मात्र 'नागेश'वर नागेशांच्या 'माझ्या कविते'चा निर्देश केला आहे.

† या कवितेचे शीर्षक 'निवेदन' असे असून ती एप्रिल १९१३ च्या मनोरंजनात आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सुमंतांसंबंधी

" कपीन्द्र " लेख गुर्जरांचाच आहे यात शंका नाही.* तो प्रेस वर असताना त्याचे सुटे फर्मे त्यांनी आवर्जून वाचावयास दिले होते. त्यात रेंदाळकरांचा मुळीच उपहास नाही. ' सुमंत ' कवीचा मात्र आहे. या ' कपींद्रा 'त–

' कविराया, कविराया, कविराया, न संशयः । '

अशी एक ओळ आहे. सुमंतांचे खरे नाव आपा धुंडिराज मूर्तले असे आहे हे तुम्ही जाणतच असाल. "

येथपर्यंतचे सर्व अंश दिनांक सत्तावीस फेब्रुवारी एकोणिसशे चौसष्टच्या दुसऱ्या क्रमांकाच्या पत्रातील आहेत. सुमंतांसंबंधी थोडा आणखी मजकूर दिनांक तीन एप्रिल एकोणिसशे चौसष्टच्या पाचव्या क्रमांकाच्या पत्रात आहे;–

" सुमंतांचा एक मोठा दोष होता. तो स्वतःबद्दल फाजील विश्वास. आपले शेणहि सोन्यामोलाचे व दुसऱ्याचे सोनेहि खापरकिंमतीचे अशी त्यांची वृत्ती होती. त्यामुळे त्यांना सारस्वतात एकहि जिव्हाळ्याचा स्नेही मिळाला नाही. शेवटी शेवटी ते माझ्या बिऱ्हाडी येत असत. स्वतःच्या कविता गात असत. मी ऐकत असे. ' फार छान ! ' असेहि म्हणत असे. परंतु ते गळ्यातून; हृदयातून नाही. रेंदाळकरांशी त्यांचे अखेरपर्यंत जमले नाही. "

द. भि. रणदिव्यांबद्दल

" रेंदाळकरांची व माझी जिनवासी रणदिव्यांबरोबर ओळख होती. पण तसा स्नेहसंबंध नव्हता. ते आयुष्याच्या शेवटी कोल्हापुरी नोकरीस होते. पण त्यांची आमची म्हणजे माझी एकत्र बैठक कधीच झाली नाही. त्यांचे मला व माझे त्यांना कधीच आकर्षण वाटले नाही. "

रेंदाळकरांच्या संदर्भात

" रेंदाळकरांचा आमच्या घरात चुलीपर्यंत स्नेहसंबंध होता. नुसता ओटीवरच तो संपत नव्हता. ते आले की माझ्या बिऱ्हाडी आठ आठ दिवस राहत. त्यावेळी माझी पत्नी त्यांची योग्यता व प्रीति डोळसपणाने जाणून त्यांची सरबराई करी. ते पाहून तेहि माझ्या घरी मनमोकळे व प्रसन्नचित्त असत. एकदा माझ्या बिऱ्हाडी असे राहून ते परत गेल्यावर त्यांनी एक सुंदर कविता माझ्या पत्नीच्या नावे पाठवून दिली. तिची चाल ' भूपतिवैभव ' आहे. व तिचे शीर्षक ' – स ' असे असून, ती रेंदाळकर कवितेच्या प्रथम खंडात आली आहे. रा० सा० व्ही० जी० चव्हाण, बी. ए., एलएल्. बी. माजी हायकोर्ट जज्ज, कोल्हापूर यांच्या घरीहि त्यांचा स्नेह असाच आत व बाहेर होता. परंतु हे घराणे मराठमोळ्याचे असल्यामुळे तेथे त्यांच्या स्नेहाला खूप मर्यादा घालणे जरूरीचे होई. रेंदाळकरांची भेट मनमोकळी व्हावी म्हणून मी या चव्हाण पतिपत्नींना मुद्दाम माझ्या घरी भोजनास बोलावीत असे. रेंदाळकरांना दुर्दैवाने स्वतःच्या पत्नीपासून निर्मळ सहवासाचा हा एकत्र सुगंध घेता येणे अशक्य झाले म्हणून ते कष्टी व उदास असत. त्यांना या स्थितीचा क्षणभर तरी विसर पडावा व ते प्रसन्न व्हावे, यासाठी आमचे हे प्रयत्न असत, व ते काही दिवस तरी यशस्वी होत असत. रेंदाळकरांनी आणि मी ' प्लेटॉनिक लव्ह ' अगोदर अनुभवले आहे. पुढे दीर्घ काळाने आम्हांस असे समजले की, अशी ' स्त्रीपुंधर्मनिरपेक्ष प्रीति ' इंग्रजी वाङ्मयात आहे. ! माझ्या वयाच्या तेविसाव्या वर्षापर्यंत मला इंग्रजीचा गंधहि नव्हता. मी पुढे कोल्हापुरी गेल्यावर माझ्या पेशास जरूर म्हणून त्या विषयावर परिश्रम केले. तथापि माझ्या पेशास लागणाऱ्या इंग्रजी विषयापलिकडे माझी धाव गेली नाही. रेंदाळकरांनीही कोल्हापूर सोडल्यावर पुढे इंग्रजीचा चांगला व्यासंग केला व नंतर चांगला वापरही केला. म्हणून आम्हा दोघांनाही असे म्हणता येते की, ही ' स्त्रीपुंधर्मनिरपेक्ष प्रीती ' आमच्या जन्माबरोबरच आमच्या हाडीमासी होती. ती अशी असू शकते हे मग इंग्रजी वाङ्मयावरून समजले; नी मग एकदा जिवलग दोस्त अकस्मात भेटावा तसा त्यावेळी आनंद झाला ! मी मलेरियाने रुग्ण झालेल्या माझ्या पत्नींना घेऊन कोरड्या हवेसाठी मिरजेस वीसच्या मे अखेरीस गेलो होतो. तेथे सवंद

* या विनोदी गोष्टीवर गुर्जरांचे नाव नाही. ती सप्टेंबर १९१४ च्या मनोरंजनांत आहे.

मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पावसाळा काढला व सौभाग्यवतीला पूर्ण बरे वाटल्या-वर परतलो. त्यावेळी एकदा रेंदाळकर माझ्या बिऱ्हाडी आले होते. फार थकले होते. अंगात ताप होता. खोकला तर ऐकवतच नव्हता. आम्हा सर्वांच्या आग्रहा-करिता जेवावयास बसले. पण त्यांना पुरते दोन घासही गेले नाहीत. त्यांची शरीरयष्टी तर बोरूसारखी झाली होती. ती सर्व लक्षणे पाहून माझे मन म्हणाले;— 'हे सुंदर गाणे लवकरच अनंतात विलीन होणार आहे ! पुढे अडीच तीन महिन्यांनी त्यांची इहलोकीची यात्रा समाप्त झाली. सांगली येथे कै. श्री. कृ. कोल्हटकर यांच्या अध्यक्षतेखाली ज्योतिष संमेलन भरले होते. त्यासाठी पुण्याहून लोकमान्य येणार होते. त्यांची काही व्याख्याने होणार होती म्हणून मी मुद्दाम कोल्हापुराहून सांगलीस गेलो होतो. संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी रात्री आठ वाजता सांगलीच्या प्रसिद्ध मारुतीच्या देवळा समोरील पटांगणावर लोकमान्यांचे व्याख्यान झाले. त्यास मी नी रेंदाळकर उपस्थित होतो."

नागेशांच्या पत्रव्यवहारातील अभ्यासकांच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले अंश येथे संपले. एकोणिसशे दहा ते एकोणिसशे सत्तावन या अवधीत नागेशांनी जवळ जवळ चार पाचशे तरी स्फुट कविता रचल्या असाव्या. एकोणिसशे चवदाच्या सुमारास त्यांच्या काही निवडक कविता 'वन्यपुष्पे' या नावाने बाहेर पडल्या होत्या. 'प्रणयगुंफन' या नावाचे एक लहान त्रुटित खंडकाव्यही त्यांनी प्रसिद्ध केले होते. लेखनाच्या प्रारंभीच्या काळात त्यांनी 'महात्मा भरत' आणि 'ऐतिहासिक स्त्रिया' ही दोन गद्य पुस्तकेही लिहिली होती. अगदी अलीकडे बाबूराव वासुदेव कारेकर, शं. व. भोसले, चंद्रकांत शेखे इत्यादी कोल्हापुरातील त्यांच्या चाहत्यांनी 'भावसूक्ते' या नावाने त्यांची निवडक कविता प्रसिद्ध करण्याची योजना आखली होती. नागेशांच्या हयातीत ती योजना आकारास आली नाही हे आधुनिक कवितेचे दुर्दैव !

नागेशांच्या समोर संस्कृत काव्यशैलीचा आदर्श असल्यामुळे त्यांच्या कवितेचे वळण काही प्रमाणात जुन्या पंडिती कवितेप्रमाणे आहे. पण काव्यविषयांच्या बाबतीत त्यांची कविता नवीन युगातील आहे. त्यांच्या कवितांचे विषय नवीन असले, तरी त्यांची अभिव्यक्ति वस्तुनिष्ठ आहे. तिच्यात भावना आहेत. पण त्या उद्दाम नाहीत. त्या उसळताक्षणीच त्यांना उद्गारांचे रूप मिळावयास हवे. त्या निवळल्या म्हणजे मग नागेश त्यांचे वर्णन करतात. या वर्णनाला नागेश कल्पनांची जोड देतात. पण त्या कल्पना अभिनव नसतात. नागेशांच्या वाणीत प्रवाह आहे. अर्थबोधाच्या दृष्टीने त्यांची कविता नितळ आहे. तिचा एकंदर घाट डौलदार आणि थाट ऐटदार आहे. आपल्या कुलीन आणि शालीन वर्तनाने ती कुणाही रसिकाच्या मनात प्रेमादर निर्माण करण्यास समर्थ आहे.

आपल्या तीन एप्रिल एकोणिसशे चौसष्टच्या पाचव्या क्रमांकाच्या पत्रात नागेशांनी मला लिहिले आहे;— "इकडील दमट हवा व वाळवीचा भयंकर उपद्रव त्यामुळे ग्रंथ व कागदपत्रे संभाळणे फार जिकिरीचे होते. मी शरीराने उभा होतो तों हे सर्व पहात होतो. पण आता तब्बल आठ वर्षे जागेवर पडून आहे. नवी पिढी घरात वावरत आहे. पण तीस या वाङ्मयाची गोडी नाही. मी हयातीत हजार आठशे पुस्तकांचा संग्रह केला. त्यात संस्कृत, इंग्रजी हिंदी व मराठीचा भरणा आहे. त्याला कोणी वाचकच नाही ! माझ्या पश्चात् तो वाळवीच्या व कसरीच्या मुखात पडणार हे भविष्य स्पष्ट दिसत आहे. याबद्दल मी नेहमी सचिंत असतो." पुढे नागेशांनी आपली हस्तलिखिते (कवितांच्या वह्या) माझ्या हवाली करण्याची इच्छा प्रकट केली आहे. या पत्राला उत्तर पाठवितांना मी त्यांना लिहिले होते की, "आता कोल्हापुरास शिवाजी विद्यापीठ स्थापन झाले आहे. आपला त्या नगरीशी जुना ऋणानुबंध आहे. तेव्हा एखाद्या व्यक्तीच्या हवाली आपली हस्तलिखिते-करण्यापेक्षा ती हस्तलिखिते व ग्रंथ विद्यापीठाला द्यावे म्हणजे अभ्यासकांच्या उपयोगी पडतील व उपकारक ठरतील." यावर त्यांना विचार चालू होता. आता त्यांच्या वारसांनी आपल्या पित्याचे स्मारक म्हणून तशी काही योजना अमलात आणावी. आधुनिक मराठी कवितेच्या अभ्यासकाने गोविंदाग्रज, बी, बालकवी, रेंदाळकर, सुमंत, रणदिवे, आनंदीरमण

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या कवींच्या कवितांचा अभ्यास करताना नागेशांच्या कवितांचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे. नागेशांनी ' गीतांजली 'च्या धर्तीवर काही ' गूढगीते ' आळवली आहेत. त्यांचा हा नमुना आस्वाद्य आहे; —

होती झाडे लाविली दोन चार ।
आला होता अल्पसा त्या बहार;
होती आशा एथुनी एकदा तू ।
की जाशील; व्यर्थ तो होय हेतू.
आता गेली हाय ; झाडे सुकोनी ।
गेली पुष्पे मातिमाजी मिळोनी;
आता झाले सर्व उध्वस्त रान, ।
दुर्दैव्याचे जेवि ते चित्त जाण.
तूते प्रेमे अल्पसे तोषवाया, ।
केला होता यत्न तो जाय वाया;
आता येथे होउनीया उदास ।
दुःखाश्रूंनी न्हाणितो हा प्रदेश.
जे जे होते साध्य ते यत्न केले ।
ते ते सारे सर्वथा व्यर्थ झाले;
प्रारब्धाला बोल लावीत येथ ।
आता खेदे राहणे हाच पंथ.
एके काळीं तोषवाया तुला मी ।
केला होता सानसा यत्न; कानी
येवो ऐसे तूझिया एकवार ।
राहे आशा एवढी, ही न फार.
[मा. मनो., ऑगष्ट १९२४]

मला नागेशांचे शेवटचे पत्र दिनांक एक सप्टेंबर एकोणिसशे पासष्टला आले. त्यांचा अठरा वर्षांचा नातू ' प्रकाश ' कोल्हापुरास राजाराम कॉलेजात शिकत होता. दिनांक एकोणिस ऑगस्ट एकोणिसशे पासष्टला तेथे लष्करी गोळीबार झाला. त्यात तो घराच्या उंबरठ्यात उभ्या उभ्या ठार झाला ! त्यावेळी मी त्यांना सांत्वनपत्र पाठविले. प्रत्येक पत्रावर एक संस्कृत अनुष्टुप रचून लिहिण्याची त्यांची वहिवाट होती. त्यांनी उत्तरी मला लिहिले; —

" सत्साहित्यसुधां वर्षन् भवानीशंकरो विघुः ।
प्रसादयन् मनः शोके, सबन्धः परमादरात् ॥

आमचा ' प्रकाश ' गेला. तो गुणी होता, विनयशील होता, उंचापुरा होता नी अत्यंत देखणाहि होता. तो न परतायच्या ठिकाणी गेला नी आम्हांस शोकसागरात ढकलले. आता आम्ही येथे गटंगळ्या खात काळ कंठू ! " नागेशांच्या आयुष्याच्या शेवटच्या दिवसात रेंदाळकरांच्या कवितेच्या निमित्ताने त्यांचा व माझा ऋणानुबंध जुळला. आज त्यांच्या स्मृतिसमाधी- वर ही श्रद्धांजली वाहात आहे.

विदर्भ साहित्य संघाचे नवे प्रकाशन
लोकसाहित्य संपदा
लेखक व संपादक : ना. रा. शेंडे
विदर्भातील लोकगीतांचे व लोककथांचे संकलन व संपादन.
रसिकांना व अभ्यासकांनाहि सारखाच संग्राह्य.
पृ. ३३६+८ डेमी] [मूल्य ६ रु.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कटयार, घोडा, पताका आणि पर्णू

—प्रा. भाऊ मांडवकर

विवाहसंस्थेचे स्वरूप परिणत झाले नव्हते त्यावेळी नवरी मुलगी पळवून वा जिंकून नेण्याची प्रथा प्रामुख्याने प्रचारात असण्याचा अधिक संभव आहे. जुन्या कथांतून, श्रीकृष्णासारख्यांच्या इतिहासातून आणि पुराणादिकांतून पराक्रमाने पत्नी मिळविण्यावर भर असलेला दिसतो. स्वयंवरातही स्वगुणांवर व स्वपराक्रमावर पत्नी मिळवावी लागे. जो शूर आणि गुणवान तोच स्वयंवरात श्रेष्ठ गुणवतीचा पती ठरत असे. स्वयंवराच्या ज्ञात प्रथेपूर्वी ओळखीची किंवा अनोळखी कुमारी पळवून नेऊन तिच्याशी लग्न लावण्याची प्रथा प्रमुखरूपाने असावी. याच प्रथेचे परिणत व सुसंस्कृत रूप स्वयंवरप्रथेच्या रूपाने आले असावे. पाऊण शतकापूर्वी नवऱ्या मुलाला कोसभर दौडवून त्याच्या छातीवर बुक्क्या मारून मग त्याला जावई म्हणून पत्करून त्यास आपली मुलगी देण्याची प्रथा सुशिक्षित समाजातही होती.

पराक्रमाने पत्नीप्राप्ती

आदिवासींच्या विवाहविषयक चालींमध्येही पराक्रमाने पत्नी मिळविण्यावर भर होता आणि आहे. गोंडांमधील प्रथा याला पूरक असून कोलामांमधील विवाहरीतीत अशाच आशयाची रूढी आहे. रानावनात कामाधामामध्ये असलेली कुमारी हेरून तिला पराक्रमाने पळवून नेणारा युवकच तिच्याशी विवाहबद्ध होऊ शकतो, अशी ती रीत आहे. ही प्रथा कोलामात पूर्वी सर्रास होती. आजही या प्रथेचे अवशेष त्यांच्यात आहेत. पराक्रमी पुरुषाला वरावे हे तर अशा मानिनींचे वैशिष्टयच !

एका गटाने दुसऱ्या गटातील लोकांवर हल्ले करावे आणि पराक्रमाने त्यांना जिंकावे, पराक्रमाने लूट मिळवावी, स्ववळावर स्त्रियाही मिळवाव्या असे त्यावेळी चाले. एका राजाने दुसऱ्या राजाला, त्याच्या मालमत्तेला आणि स्त्रियांना जिंकून आपल्याकडे आणावे हाही प्रकार त्यातलाच ! अशा शत्रुरूप अनोळखी लोकांवर हल्ले करून स्त्रिया मिळविणे पुढे पुढे कमीपणाचे अथवा असंस्कृतपणाचे ठरून लग्नप्रथेत सामंजस्य आले आणि मग लग्नामध्ये पराक्रमाशी संबंधित अशा पूर्वप्रथांच्या खाणाखुणा रूढींच्या निमित्ताने शिल्लक राहिल्या.

विवाहातील कटयार

क्षत्रिय वा तत्सम लोकांमध्ये लग्नाच्या वेळी कटयार हे शस्त्र अथपासून इतीपर्यंत नवरदेवाबरोबर मिरविले जाते. लग्नासारख्या आनंदी प्रसंगीही कटयार जवळ बाळगणे हे वीरवृत्तीचे व पराक्रमाचे द्योतक तर आहेच; परंतु आणलेल्या कुमारीशी विवाहबद्ध होण्याच्या वेळी प्रत्यक्ष नवऱ्या मुलाला असेच शस्त्रसज्ज स्थितीत पूर्वीच्या काळी राहावे लागत असेल आणि लग्न उरकून घ्यावे लागत असेल याची ती खूण आहे. एरवी आज त्या कटयारीचे महत्त्व तरी आहे काय ? उलट, हास्यविनोदाच्या वातावरणात ती कटयार वागवीत राहणे विसंगत व हास्यास्पदच ठरू शकते. लग्नाच्या संपूर्ण विधींमध्ये कटयारीचे काही विशेष काम आहे असे तिळमात्रही समर्थिले जाऊ शकत नाही. ही वस्तुस्थिती आहे. तेव्हा, केवळ पूर्वकृतीची स्मृती यापलीकडे या कटयारीचे स्थान

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विवाहात काहीच नाही आणि ही स्मृती पराक्रमाने मुलगी पळवून तिच्याशी लग्न लावण्याच्या पूर्व रीतीची परिचायक आहे, स्वपराक्रमाने पत्नी मिळविण्याच्या पूर्वीच्या वीरश्रीयुक्त घोरणाची आठवण आहे, असेच म्हणणे अधिक प्रशस्त होईल.

नवरदेवाचा घोडा

नवरदेवाने घोड्यावरून जाणे याही प्रथेला अशाच तऱ्हेचा अर्थ चिकटलेला आहे. मोटारीतून जाणाऱ्या नवरदेवाच्याही सोबतीला रूढी म्हणून काही वेळा घोडा आढळतो. हा घोडा कधी कधी समारंभाच्या वेळी बाजूला सजवून नुसता उभा ठेवलेला असतो. कधी नाममात्रच नवरदेव त्या घोड्यावर बसतो. कधी नवरदेव पूर्ण मिरवणुकीभर त्या घोड्यावर बसला तरी त्याला घोड्यावर बसता येतेच असे नाही. अर्थ हा की, घोड्यावर बसता आले नाही किंवा घोड्याची गरज नसली तरीही चालेल पण रूढी म्हणून घोडा असणे आवश्यक मानले जावे, यातून पराक्रमाने पत्नी मिळविणे हाच अर्थ फलित होऊ शकतो. घोड्यावर स्वार होऊन कट्यारीच्या जोरावर वीरत्व, शूरत्व व पुरुषत्व यांचे प्रदर्शन करून पत्नीलाभ करून घेण्याची आद्यप्रथा आज या रूपांनी व्यक्त होते, हेच खरे !

पताका

वतनदार, पाटील, देशमुख क्षत्रिय व पारंपरिक मानाची काही कुळे लग्नात अग्रभागी लाल पताका मिरवीत नेताना आजही आढळतात. काही वर्षांपूर्वी ही प्रथा अधिक प्रमाणात होती. शुभसूचक म्हणून पताकांचा वापर होत असावा हे तर खरेच; पण याहीपेक्षा विजयचिन्ह म्हणून पताका वा गुढी उभारणे हा त्यामागचा वास्तव अर्थ आहे. विजय मिळाल्यावर गुढ्यातोरणे व ध्वजापताका उभविणे हा आनंदोत्सवाचा प्रमुख भाग आहे. शत्रूला भीक न घालता नवरी मुलगी आणून तिजशी विवाहबद्ध होणे हे शौर्याचेच काम होते. तो विजय ध्वजापताकांच्या रूपाने प्रकट होई. आता ती प्रथा लग्नात पताका लावून चालविण्यात येते.

पर्णू

नवरीच्या घरी लग्न लागले तर नवरदेव तेथे जाऊन नवरीच्या घरी लग्न लागते. नवऱ्याच्या या जाण्याला ' पर्णू जाणे ' असे म्हणतात. काही आदिवासींमध्ये मुलगीच नवरदेवाकडे ' पर्णू ' जाते. इतरत्र बहुतेक नवरदेवच पर्णू जातो हे जवळजवळ ठरलेलेच आहे. ' पर्णू ' हा शब्द ' परिणयु ' असावा असा संकेत मी माझ्या ' कोलाम ' या ग्रंथात दिला आहे.* ' पर्णू 'चा ' परिणयार्थ ' हा अर्थ असावा असा माझा तर्क आहे. याहीपेक्षा आणखी एक समर्पक असा अर्थ या शब्दामागे असावा असे मला वाटते. ' कोलाम 'मध्ये ह्या दुसऱ्या अर्थाची चर्चा करण्याचे कारण – प्रयोजन नसल्यामुळे तेथे ती चर्चा केली नाही.

कृषिव्यवसायावर जगणारे आजचे जातिसमाज आजच्या या अवस्थेपूर्वी क्षात्रजीवन जगत होते. भटकणारे शिकारी स्थिर झाले व जमिनीवर जगू लागले. भटकणारे शिकारी म्हणजे क्षात्रजीवन जगणारे लोक त्यांच्या त्या अवस्थेपूर्वी आदिवासी-जीवन जगणारे होते. म्हणजे आदिवासीनंतर क्षत्रिय व क्षत्रियानंतर कृषक अशी त्या जातिसमाजांची वाटचाल झालेली आहे. प्रथमारंभीच्या रीती–रूढी संक्रमित होत होत अथवा परंपरेने पुढे सरकत सरकत आजच्या क्षत्रिय-वैश्यसम जातिसमाजात सुरू राहिल्या. ' पर्णू ' या शब्दात असलेला एक विशिष्ट अर्थ या विवेचनाला पोषक ठरेलसे वाटते. जुनी मराठी भाषा, काही आदिवासी भाषा वा त्यांच्या द्राविडी भाषाभगिनी यांच्यांतील शब्दांमध्ये उकारप्रावल्य आहे. विवेकू, धीरू, जमालमडगू, सीतारामलू अशी अनेक उदाहरणे देता येतील. पर्णू हा शब्द असा उकार लागून तयार झाला, असे धरले तर तो मूळ शब्द ' पर्ण ' आहे. (अर्थात हा शब्द संस्कृतसापेक्ष आहे.) दुसऱ्या गोटातून मुलगी पळवून आणणे व तिच्याशी लग्न लावणे हे कठीण कार्य करणारे लोक सहजासहजी मुलगी आणीत असतील हे शक्यच नाही आणि आपल्या घरातील

---

* भाऊ मांडवकर : कोलाम : पृ. १४५

(पुढील मजकूर पान १४६ वर)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

‘टक् टक् टक्....खर्र खर्र....टक् टक्’

—सौ. पद्मा श्रीश जोशी

एकटीच मी पेपर तपाशीत बसल्ये होत्ये. सोमवारी अकरा वाजता पेपरांचे गठ्ठे शाळेत न्यायचे होते. उद्याचा एकच दिवस शिल्लक होता. पेपरांचे कांही गठ्ठे अजून मी सोडल्ये देखील नव्हत्ये. तपासण्यात अगदी गढून गेलेली. वरप्रमाणे आवाज दारावर ऐकू आले. संध्याकाळची वेळ आणि घरी मी एकटी. दचकलेच. बसल्या ठिकाणावरूनच प्रश्न केला ‘कोण आहे ?’ आवाज बंद झाला. उत्तर मिळाले नाही. पेपर पुढे तपासू लागल्ये. पुन्हा ‘कट् कट् कट्’. उजेड आणखी कमी झालेला. हे कामावर गेलेले आणि मुलगे दोस्ताकडे गेलेले. कोणाला हाक मारू ? शेजारचे घर जरा पलीकडेच होते. बाहेरच्या अंगणात कोणीच दिसत नव्हते. राधाबाई नाही, सुशीला नाही, विजया नाही. कोण्णीच दिसत नव्हते आज ! नाही तर रोज अंगणात बैठक असतेच. आजच नेमकं सगळ्याजणी कुठं गेल्या की ? बसल्या ठिकाणावरून खिडकीवाटे नजर पोचेतोवर कोण्णी कोण्णी दिसत नव्हते. बसल्या जागेवरून उठण्याची हिंमत होईना. थंडी नव्हती पण उकाड्याचे दिवस कधीच सरले होते. तहान लागलीसे वाटले. बाजूला पेपरांच्या पलीकडे तांब्या–पेला होता. घेण्यासाठी हात लांब केला. तितक्यात पुनः दारावर ‘खर्रऽ खर्रऽ’ आवाज आला. हात आपोआप मागं आला. आता काय करू बाईऽ ? पुनः खिडकीवाटे नजर टाकली. अज्जून कोणी दिसेना. घसा कोरडा पडत चालला. तळहात ओला झाला होता. घामाने. पुनः कट् कट् खर्र खर्र खर्र कट् कट् खर्र खर्र. केसांवरून हात फिरवायला गेल्ये. कपाळावर घाम लागला. पुसला. पंचाइत आली. वाटलं, आता दारावर धक्का बसणार. डोळ्यांतून पाणी पडणार असे वाटे, पण येत नव्हते. ओरडावेसे वाटू लागले. पण ओरडायला गेलं तर आवाज घशातून बाहेर पडेलच याची खात्री वाटेना. पुनः हात लांब केला, जरा ताणलाच. आवाज न करता पेला काढून ठेवला आणि तांब्यालाच तोंड लावले. एक घोट घेतला. दाराकडे डोळे वळले. दुसरा घोट घेतला. थोडे बरे वाटले. आवाज न होण्याची खबरदारी घेऊन अर्धा तांब्या रिकामा केला. पाण्यात बोट बुडवून डोळ्यांना लावले. वाटले, आता हिंमत करावीच. पदर सावरला आणि दार उघडण्यासाठी पुढे गेल्ये. कानोसा घेतला. कडीला हात लावला. कडी तर काढली. आपण उघडायच्या आधी बाहेरच्याने दार ढकलू नये म्हणून डावा हात दारावर ठेवलाच होता. उघडू का नको ? मन हेलावू लागले.

पुनः विचारांचा भरणा सुरू झाला. नाही नाही ते विचार मनात येऊ लागले. वर्तमानपत्रे फारशी मी वाचीत नाही. वेळच मिळत नाही. पण पोळ्या लाटता लाटता मुलांनी किंवा ह्यांनी वाचून दाखविलेले मात्र ऐकल्ये. थोड्या महिन्यांपूर्वीची ती गोष्ट. मुंबईसारख्या आंतरधर्मीय आणि आंतरराष्ट्रीय शहरात कोणाशी बोलायची देखील चोरी. कोण कोणत्या कामात गुंतलेले असते, कोण जाणे. पण राहण्याकरिता कोणालाही कुठलीही जागा मिळते. अगदी निर्जला एकादशी करणाऱ्या वैष्णव ब्राम्हणाच्या शेजारच्या फ्लॅटमध्ये छान खमंग मासे तळले जात असतात. दुसरीकडे एखादी पायघोळ घरगुती झगा घातलेली, बॉबकट

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केलेली गौरकाय (हिंदुस्थानीच) तरुणी दार हळूचं अर्धवट उघडून अंड्यांची टरफलं गॅलरीत ठेवलेल्या कचरा-डब्यात टाकीत असते. अशा रीतीने एकाच चाळीत शेजारच्याच ब्लॉकमध्ये राहणारी माणसे देखील अपरिचित असतात. जितके जास्त सुधारलेले माणूस, तितके ते जास्त संपर्कशून्य. त्यामुळे शेजारच्या खोलीत कोणी कोणाचा जीव घेतला तरी 'काय आहे' म्हणून जाऊन विचारण्याची सोय नाही. प्रसंगी कॉरिडॉरकडची सर्वांची दारें बंद ठेवण्याची फॅशन (आवश्यकतेमुळे असू शकेल) पडली असल्यामुळे असे काही झाल्यास पत्ता देखील लागत नाही शेजारच्याला. अशाच एका फ्लॅटमध्ये एकदा कोणा माणसाने दारावर टिक टिक करून दार उघडवले. घरमालकीण एकटीच घरी होती. वेळ सुमारे दुपारी चारची. साहेबांचा काहीतरी निरोप सांगितला. त्याप्रमाणे ती बाई काहीतरी आणायला आतल्या खोलीत गेली. पाठोपाठ हा मनुष्य देखील त्या खोलीत शिरला. बाहेरचे दार बोल्ट केलेच होते. आत शिरल्यावर त्याही खोलीचे दार त्याने बंद करून घेतले. मग नको तो प्रसंग त्या बाईवर ओढवला. त्याच्याही पलीकडे तो गेला होता. पाचानंतर साहेब मॉंटेसरीतून आपल्या तीन वर्षांच्या मुलाला गाडीतून घेऊन आले. बायकोला इशाऱ्यासाठी दारावर थाप मारली. दार त्या धक्यानेच उघडले. आश्चर्यचकित झाला तो माणूस. मुलासह तो 'अगं अगं' करीत तो आत गेला; पाहतो तो काऽय ? ते दृश्य पाहून त्याला भोवळच आली. ती गृहिणी अब्रू आणि प्राण या दोन्हीनिशी गेली होती. ते दृश्य माझ्या मनश्चक्षूंसमोर उभे राहिले माऽत्र. काहीतरी थंड थंड पाठीच्या कण्यावरून सरपटत गेल्यासारखे वाटले. तळहात घामारले. कुठून तरी वाऱ्याची झुळूक कपाळाला चाटून गेली. कपाळालाही दवबिंदू लागले होते. दार उघडण्याची हिंमत होईना. डावा हात तसाच ठेवून डोके पण दारावर टेकवले. काही वेळाने वाऱ्याची झोत अंगाला लागली. किती वेळ तशीच राहूऽऽ ? तहान लागली. पुनः दाराला पुनरपि कडी लावण्याची हिंमत होईना. आवाज झाला तऽऽर ? त्याच अवस्थेत आणखी उभे राहणेही नकोसे वाटू लागले. म्हटले, आता पुढे पाऊल टाकावेच.

एकदा उजवा हात छातीवर ठेवून मनाला सावरले. विघ्नहर्त्या गणरायाचे स्मरण केले नी दार ओढल्ये. तोंडातून 'कोणाहेऽ ?' शब्द कसेबसे बाहेर पडले. किती जोराने, ते मात्र समजले नाही; पडले की नाही, तेही समजले नाहीं. पण दार उघडल्याबरोबर एक करड्या रंगाची मांजर 'म्यांव' पायरीवरून टुणकन् उडी मारून फाटकाकडे धावली, 'हुंः हास्येच्या' हसू येऊ लागले. भीतीचा बोझा डोक्यावरून जमिनीवरच पडला. स्वतःशीच हसत सुटल्ये. हसता हसता डोळ्यांतून पाणी येऊ लागले. पलीकडे पाहिले. घराघरातून दिवे लागले होते. बाहेर कोणीच दिसत नव्हते. हेच बरे झाले. नाहीतर स्वतःची फजिती आपल्याच तोंडाने सांगण्याची पाळी आली असती. पण हसू आवरेना. हसण्यामुळे येणाऱ्या डोळ्यांतील पाण्याच्या सरी सरेनात. मुन्शीपाल्टीच्या रस्त्यावरील मोजके दिवे देखील पाण्याच्या लाटात अनेक दिसू लागले. जणू माझ्या फजीतीचा दीपोत्सवच. तो पहात कोचावर बसल्ये. तितक्यात मुलांच्या सायकली वाजल्या आणि मागोमाग हाक आली—'आईऽऽ'.

कै. कवि नागेश ह्यांच्या छायाचित्राचा ब्लॉक वापरूं दिल्याबद्दल आम्ही व्यवस्थापक आणि संपादक दै. मराठा ह्यांचे ऋणी आहोत.

—संपादक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(लघुनिबंध)

अश्रू

—मधु जामकर

पावसाळी ढग आकाशात पसरत जावेत तशी सुन्नता पसरत जाते. कोंडलेल्या जिवाची कासाविस वाढू लागते. शरीराचे ओझे फेकून देण्याइतके वाढते. वाहता वारा सुन्नतेत मिसळून जातो. आणि झाडांची पाने तडफडू लागतात. पाखरे घरट्यातून बाहेर व बाहेरून घरट्यात येतात नी जातात. त्यांना ही ये-जा कळतच नाही. सगळ्याच सावल्या बाजूच्या संथ तळ्यात बुडया घेतात. मग मासे भीतीने एका कोपऱ्यात लपून जातात. अशा वेळी अश्रू नकळत गळू लागतात. जणू सुन्नतेच्या राज्यात अश्रूवर तिचाच हक्क. पण अश्रू काय कमी चलाख? ते सुन्नतेला गोडीने बाजूला सारतात आणि स्वतःच्या अस्तित्वाने चमकू लागतात. तेव्हा कुठे अश्रूंना स्वतःचे चीज वाटते व सारी सुन्नता मग तळ्यात साखरेप्रमाणे विरघळून जाते.

लहानपणी मला कुणी 'रडका' म्हटलं की, मोठा कमीपणा वाटत असे. पुढे जसजसा मी मोठा होत आलो तसा माझा रडकेपणा अपरिहार्यपणे आपोआप कमी झाला, पण मला त्याचे समाधानच वाटेना. कारण मी अश्रूंच्या मोठ्या सौंदर्याला मुकलो ना. तेव्हा कुठे मला 'लहानपण दे गा देवा' यातील मर्म कळू लागले. शिक्षकांनी शाळेत विद्यार्थ्यांना मारू नये अशी मोहीम काढल्याने शिक्षक विद्यार्थ्यांच्या अस्सल सौंदर्याला व कौतुकाला मुकले यात शंका नाही. 'छडी लागे छमछम्' ह्या म्हणीचा जन्मदाता बुद्धिमान असावा. बापडा! अश्रुसाठी हपापलेला तर नसेल ना? माणूस जन्मला की प्रथम रडतो. ज्या अश्रूंनी जीवनाची सुरवात होते त्यांचे शुभदर्शन प्रथम आईलाच घडते म्हणूनच ती श्रेष्ठ ठरली जाते.

काकांचा स्वभाव मला अगदी चॉकलेटाप्रमाणे आवडतो. ते जेव्हा घरी येतात तेव्हा लहानापासून ते मोठ्यापर्यंत साऱ्यांना हमखास रडकुंडीस आणतात आणि मग कुठं त्यांच्यातला कवी जागा होऊन म्हणू लागतो—'सदू रडत नाही, तो मोती सांडित आहे', 'मंदाने आपल्या हरणीच्या डोळ्यात दवबिंदू साचविले आहेत' आणि मग सगळे हसू लागतात. रडक्या पण हसऱ्या चंदूकडे बोट दाखवीत काकांचे बोलणे 'याला म्हणतात आनंदाश्रू' अशाने संपते. काका ऑफिसला जातात आणि मी मात्र अश्रूंच्या खिरापतीसाठी वाट पाहात बसतो.

परवा नाही का, सरांनी शेलेची कविता तल्लीनतेने शिकवली आणि 'Our sweetest songs are those that tell of saddest thoughts' हा मानवी जीवनाचा सिद्धांत आम्हापुढे मांडला. मला मात्र त्यातलं प्रथम काहीच कळलं नाही. पण जेव्हा संध्याकाळी अरुणबरोबर फिरायला गेलो तेव्हा त्यानें शेलेवर बेवडक 'रडका' म्हणून रिमार्क मारला तेव्हा कुठं वरील सौंदर्यपूर्ण सिद्धांताचे सार मला कळले. एवढंच काय माझा एकमेव कवी शेलेच झाला व रोज अरुणबरोबर फिरताना मला त्याची कीव वाटू लागली. क्रौंच पक्षावर बाण

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मारताना पाहून विरहावस्थेतून वाल्मिकींना म्हणे काव्य सुचले. पण मला वाटते प्रथम वाल्मिकींनी त्या जोडप्याकडे पाहून अश्रू गाळले असतील आणि मग त्या अश्रूंनी त्यांना काव्यास स्फूर्ती दिली असेल. म्हणून वाल्मिकी 'न भूतो न भविष्यति' ठरले. कवी लोक फारच हळवे व रडके असतात. खरोखरीच यात त्यांच्या गौरवाचा किती तरी भाग आहे. कवी रडके असतात म्हणूनच कवी नावाने शोभतात.

द्रौपदीवर नेहमी संकटे येत व तिचा आपला रडत रडत कृष्णाचा धावा सुरू होई. पण कृष्ण मोठा धूर्त! आपल्याला द्रौपदीचे अश्रू मिळावेत म्हणून संकटेच संकटे पाठवीत राही. बिचारी भोळी द्रौपदी, तिला कुठलं कृष्णाचं कारस्थान कळणार? देवाला म्हणे सत्तेची हाव असते. परंतु देवकोटीला पोचलेला कृष्ण अश्रूंसाठी हावरा झाला नाही का?

उन्हाळ्याची सुट्टी संपली आणि मी परत इकडे येण्यास निघालो. येताना मी सर्वांना पद्धतीप्रमाणे नमस्कार केला. तितक्यात कोपऱ्यात रडत असलेली आजी मला दिसली आणि मला समाधान वाटलं. माझा सारा प्रवास तिच्याच अश्रूंवर तरंगून गेला. अश्रू म्हणे लवकर नाहीसे होतात. पण त्यात नवल काय? अश्रूंनी आपली चमक दाखवली—ना दाखवली तोच सारेजण त्यांना हावरेपणाने आत्मसात करतात आणि त्यांच्यावर स्वतःचाच हक्क गाजवितात. माणसाचे जीवन पाण्याचा बुडबुडा आहे. याहीपेक्षा 'जीवन म्हणजे अश्रू' ही कल्पना कवीवर मात करणारी नाही का?

तारुण्यात म्हणे माणसाच्या चेहऱ्यावर तेज चढते. बालपणी खूप रडके असल्याने साऱ्या अश्रूंचे सौंदर्य एकत्र येऊनच जणू काय तारुण्याला बहर येतो. आणि म्हातारपणी जणू नव्या अश्रूंना जन्म देण्यासाठी त्यांच्या चेहऱ्यावर पूर्वतयारी साठवलेली दिसते—पण काही म्हातारी माणसे आपले अमूल्य अश्रू न सोडण्यासाठी हटवादी बनण्यास देखील कमी करत नाहीत. त्यांना वाटते आपल्या उम्र्या जीवनाची हीच एकमेव ठेव आहे. साऱ्या आयुष्याची तेजस्वी कर्तबगारी एका अश्रूत साठवली जाते, आणि मग कळू लागतं की यशोदेला कृष्णाच्या तोंडात सारे ब्रह्म दिसले त्याहीपेक्षा अश्रूंची थोरवी जास्त आहे. क्षणभर आपल्याजवळ असलेल्या अश्रूंचे कौतुक वाटते आणि पुन्हा क्षणांनी अश्रू नसल्याचा पश्चात्ताप वाटतो पण रडू मात्र येत नाही. अशा वेळी मी जितका अतृप्त तितकाच तृप्त, जितका सुखी तितकाच दुःखी होतो.

अश्रूंचा खेळ मला मनापासून आवडतो पण त्याहीपेक्षा अश्रू माणसांना खेळविताना फारच खुलून दिसतात. लहान मुलींनी झिम्मा खेळावा आणि स्वतःस विसरून जावे तसे माणसे स्वतःस विसरून अश्रूत मिसळतात. आकाशातून निसर्गतः पाऊस पडतो यावर विश्वास ठेवून सुद्धा नेहमी माझे मन एका गोड कल्पनेत गुंगलेले असते की स्वर्गातील देव व गंधर्व एकत्र येऊन आनंदाने खेळत असावेत व त्याच नितांत हर्षातून गळणारी आसवे म्हणजे तर पाऊस नव्हे ना? पण लगेच दुसऱ्या क्षणी विचारे देव-गंधर्व मंडळी अशा थोर अश्रूंना मुकली यावद्दल वाईट वाटते व त्यांच्या उदारपणाचे कौतुक करण्यात मला समाधान मानावे लागते.

अश्रू येतात आणि माणसाला माणसाचा आकार येतो. त्यांच्यात जीवनरस अश्रू ओततात. म्हणून जीवन रसाळ दिसते. त्यास पाहून इतरांना जगावेसे वाटते. बहिऱ्यांना कान फुटल्याचा आनंद होतो. तर आंधळ्यांना डोळसपणा येतो व अश्रू अभिमानाने ताठर बनतात.

अश्रू जातात आणि माणसातला माणूसच नाहीसा होतो. जीवन कोरडे बनते. आयुष्याच्या साऱ्याच क्रिया बंद होतात. आणि शरीराचे पुन्हा ओझे वाढते. न पेलणारे ओझे! म्हणूनच ते नकळत फेकले जाते. आकाशात ढग जमतात. सुन्नतेचे पुन्हा राज्य पसरते. कोंडलेला जीव आपोआप बाहेर येऊन सुन्नतेत मिसळतो. पावसाच्या सरीवर सरी येऊ लागतात. झोपलेले तळे खडबडून जागे होते व मासे पुन्हा त्यात खेळू लागतात अन् झाडांच्या पानांचा थर अलगद तळ्यावर साचतो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महिमा (काळाचा ?)

—'अहेत'

गेली पंचवीस वर्षं शिक्षणाचं कार्य करणारे गुरुजी निवृत्त होऊन आपल्या गावी जाणार होते. त्यांच्या मार्गदर्शनामुळं त्यांच्याच संस्थेत शिक्षण घेऊन अनेकांनी आपला भविष्यकाल उज्ज्वल केला होता.

गुरुजींना निरोप द्यायचा एक मोठा समारंभ आयोजित करण्यात आला. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत यशस्वी होऊन प्रांताच्या मंत्रीपदावर वर्णी लागलेल्या मंत्र्यांनी समारंभाचे अध्यक्षस्थान मंडित करण्याची स्वीकृती दिली होती.

'मंत्रीप्रथे'नुसार कार्यक्रमाची वेळ होऊन अर्धा पाऊण तास वाट पाहूनही नियोजित अध्यक्ष यायची चिन्हं दिसेनात किंवा त्यांचेबद्दल काही बातमीही कळेना, म्हणून उपस्थित नगराध्यक्षांना विनंती करून समारंभ साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

गौरवपर भाषणानंतर गुरुजींनी उत्तरादाखल भाषण केलं :—

"पदवी घेतल्यावर केवळ पंचविशीत मी या शहरात भीत भीत आलो. त्यावेळच्या संस्थांत शिक्षकाच्या नोकरीसाठी केलेल्या अर्जाचा काहीच उपयोग न झाल्यामुळं खाजगी शिकवण्या करायचं ठरवलं.

"कित्येक महिने एकाच शिकवणीवर भागवावं लागलं. विद्यार्थी मिळाला तोही गुंड, शिकण्यात लक्ष नसलेला. वडलांच्या धाकामुळं जेमतेम अर्धा पाऊण तास हजर असायचा. शाळेतून बुट्टी मारून मारामाऱ्या करणं, मुलींच्या खोड्या करणं, चोऱ्या करणं यातच त्याला आनंद. शिकवणीचे पैसे मिळायचे एवढंच मला समाधान होतं. काही दिवसांनी तो घरीच चोरी करून गावातनं पळून गेला.

"काही काळ निराशेत नी हलाखीत काढल्यावर मात्र पुरेशा शिकवण्या मिळाल्या. पुढं विद्यार्थी वाढले. धीर येऊन एक शिक्षण संस्था काढायचं धाडस केलं. आता या संस्थेतर्फे प्राथमिक शिक्षणापासून महाविद्यालयीन शिक्षण मिळण्याची सोय झाली आहे.

"सरस्वतीच्या कृपेनं, आणि आपणा साऱ्यांच्या स्नेहपूर्ण उत्तेजनानं आणि सक्रीय सहकार्यानं यश येऊन आदर्श शिक्षण संस्था म्हणून महाराष्ट्रात या संस्थेनं नाव मिळवलं आहे.

"आज हे सारं आणि आपणाला सोडून जाताना मन भारावलं आहे हे तर खरंच, पण आपलंच हे आपल्याच पदरात टाकून त्याची नीट जोपासना होईल या खात्रीनं समाधानही वाटतं.."

एवढ्यात 'आले' 'आले'चे आवाज आणि पाठोपाठ मंत्री सभागृहात आले. बऱ्याच धावपळीच्या गोंधळानंतर मंत्र्यांनी व्यासपीठ गाठलं आणि आल्यासारखं आभाराच्या भाषणापूर्वी चार शब्द बोलावे अशी त्यांना विनंती करण्यात आली.

अर्पण केलेला हार आणि टोपी नीट तिरपी करीत त्यांनी आरंभ केला.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" गुरुजी साहेब आन् बंधू-भगिनींनो, उशीरा आल्यावद्दल माफी चाहतो. आम्ही आताच एका गावाहून सत्कार घेऊन आलो आणि लगेच दुसऱ्या गावाला पण सत्कार घ्यायलाच जाणार आहोत. त्यामुळं आपला जास्त वेळ घेत नाही.

" गुरुजींचा आपण सत्कार केला; गावाचं नाव राखलं. गुणी माणसाची कदर केल्यानंच देशाची भरभराट होते. या समारंभाला आमचे हात लागल्यामुळे आम्हाला फार आनंद वाटतो आहे.

" आपल्या प्रमाणेच गुरुजी आम्हालाही वंदनीय आहेत. त्यांना आठवत नसेल, पण ते या गावी आले तेव्हा त्यांची पहिली शिकवणी आम्हालाच होती.... ...."

गुरुजींच्या चेहऱ्यावर आश्चर्य उमटलं, पण श्रोत्यांतून हशा का उठला हे मंत्री महाशयांना समारंभ संपल्यावरही कळलं नाही.

(पान १४० वरून)

मुलगी साक्षात लक्ष्मी, अब्रूचा मानदंड – घरातून किंवा आपल्या स्थानाहून सहजासहजी आईबाप आणि नातेवाईक तरी कसे नेऊ देतील ? ते विरोध करणारच ! मुलगी पळवून नेणाराचा ते पाठलाग करीत असणार, हे निश्चितच ! त्यांच्यात आपसात लढाया होत असतील. आद्यावस्थेतील लोकांच्या अशा संदर्भातील युद्धांमध्ये हल्ला करणारे लोक गनिमी पद्धतीने लढून मध्येमध्ये पर्णांमध्ये, रानामध्ये, जेथे पर्णांचा पसारा किंवा झाडी आहे अशा जंगलांमध्ये लपत असतील. मुलीला पळवून नेण्यासाठी येताना किंवा मुलगी पळवून परत जाताना ते या पर्णांचा आश्रय घेऊन लपतछपत जात येत असतील. नाही तरी काही आदिवासींच्या मुली विवाहानिमित्त पळविताना मुलाकडील लोक नदीनाल्यांमधील दऱ्याखोऱ्यांतील वनराजीचा, शेताच्या बांधाजवळील झाडोऱ्याचा, झाडापानांचा आश्रय घेतात वा घेत असत असे त्यांच्या विवाहप्रथांवरून स्पष्टच दिसते. कोलामांची जी पारंपरिक विवाहरीत आहे तीमध्ये असेच घडते तेव्हा, आजच्या प्रगत समाजाचे प्राचीन अप्रगत आदिवासीसदृश जीवनाचे जे रूप असेल त्या काळातील लग्नात नवरा मुलगा पर्णांचा आश्रय घेत असेल. दोन्ही पक्षांना ' पर्ण ' आधारला राहत असतील. ' नवरा मुलगा पर्णू गेला ' म्हणजे ' विवाहासाठी मुलगी आणायला लपतछपत तो रानावनातून गेला ' हा अर्थ त्यावेळी निश्चितपणे लोक समजत असले पाहिजेत. पुढे कृतीत फरक पडत गेला तरी नवऱ्या मुलग्याच्या या जाण्याला पर्णू जाणे हाच शब्द लावला जाऊन तो कायम झाला असणे अधिक शक्य आहे.

पर्णू या शब्दाचा हा अर्थ लक्षात घेतला तर विवाहप्रथेतील मुलगी पळविण्याच्या कृतीमागील वीरत्वसूचक वृत्तीचा परिचय यातूनही मिळतो आणि कट्यार, घोडा, पताका व पर्णू यांच्या अन्योन्यसंबंधाचे घनिष्टत्व प्रत्ययास येऊ शकते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्रीधराचे काव्यविषयक विचार

सौ. उषा मा. देशमुख

श्रीधराच्या काव्याचा आजपर्यंत चरित्रात्मक पद्धतीने व संकलनात्मक दृष्टिकोणातून अभ्यास झाला आहे. श्रीधराच्या कवितेचे काव्यविषयक दृष्टिकोणातून परीक्षण करण्याचे प्रस्तुत उपयोजिले आहे. 'हरिविजय' 'रामविजय' व 'पांडवप्रताप' या ग्रंथांत श्रीधराची काव्यविषयक अशी विशिष्ट भूमिका आहे काय ? श्रीधराच्या काव्यामागचे मूळ उद्दिष्ट कोणते असावे ? याचा विचार केला पाहिजे.

—१—

प्रथम श्रीधराच्या दृष्टिकोणातून काव्याला आवश्यक अशा कोणकोणत्या गोष्टी आहेत, याचा शोध घेण्याचा प्रयत्न करू.

'दृष्टान्तें ग्रंथ शोभे'

'रामविजया'त श्रीधर म्हणतो—

अमृताहून गोड अन्न ।
परी रुचि नये शाकेविण
दृष्टान्ताविण ग्रंथ संपूर्ण ।
रसीं न चढे सर्वथा ।।
रत्नखाणीं मेरु पाठारीं ।
तैसें दृष्टांत कथां माझारीं
कमलावांचोनि सरोवरीं ।
शोभा नये सर्वथा ।।
अलंकारें शोभे नितंबिनी ।
कीं गगन मंडित उडुगणीं
कीं मानस सरोवरा हंसावाचोनी ।
शोभा नयेचि सर्वथा ।।
कीं मननाविण श्रवण ।
कीं सद्भावाविण कीर्तन
कीं क्षेत्र जैसें बीजाविण ।
दृष्टांताविण ग्रंथ तैसा ।।
रा. वि. ३ : ६–९.

यावरून श्रीधराच्या मते काव्याचे व्यवच्छेदक लक्षण दृष्टान्त आहे असे कळून येते.

मेरू सुंदर रत्नेंकरून ।
कीं नक्षत्रेंमंडित गगन
कीं वृक्ष फळीं परिपूर्ण ।
तैसा दृष्टान्तें ग्रंथ शोभे ।।
कीं शांति क्षमा दया विशेष ।
तेणें मंडित सत्पुरुष
कीं परिवारा समवेत नरेश ।
दृष्टांत सुरस ग्रंथीं तैसे ।।
रा. वि. १ : ६६, ६७.

रत्नांमुळे मेरूपर्वताला, नक्षत्रांमुळे आकाशाला आणि फळांमुळे झाडाला पूर्णता येते त्याप्रमाणे दृष्टान्तांमुळे ग्रंथ शोभायमान होतो. सत्पुरुष हा शांती, क्षमा आणि दया यांमुळे अलंकृत होतो, भोवतालच्या परिवारामुळे राजाला शोभा येते, त्याप्रमाणे दृष्टांतांमुळे ग्रंथ परिपूर्ण होऊन अलंकृत होतो.

यावरून दृष्टान्त हा काव्याचा एक आवश्यक व महत्त्वाचा घटक आहे; दृष्टान्तावाचून ग्रंथ रसावर आरूढ होत नाही. 'दृष्टान्ताविण ग्रंथ संपूर्ण । रसीं न चढे सर्वथा' (रा. वि. ६ : ९) असे श्रीधर म्हणतो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उत्स्फूर्तता

'रामविजया'च्या चवथ्या अध्यायाच्या प्रस्तावनेत श्रीधर म्हणतो—

सभानायक प्रवीण अत्यंत ।
करी संदेह–धनुष्य घेत
प्रश्नाक्षर–शर सोडित ।
आशंका–समय लक्षोनि ॥
मग धैर्य–ठाण कवीनें मांडून ।
चढविलें स्फूर्तीचें शरासन
शास्त्रसंमताचे बाण ।
सोडी अभंग अनिवार ॥

रा. वि. ४ : ११, १२

अत्यंत कुशल अशा सभापतीने शंकेचा समय ओळखून संदेहरूपी धनुष्याने प्रश्नाक्षररूपी बाण कवीवर सोडले कवीने धैर्य धरून, स्फूर्तीचे धनुष्य हाती घेऊन शास्त्रमान्य असे वाग्बाण संतत सोडावे.

या रूपकात उत्स्फूर्तता जर कवीच्या ठिकाणी असेल तर शास्त्रसंमत वचनांचा आविष्कार करील असे श्रीधर म्हणतो. या उद्गारांवरून उत्स्फूर्तता ही काव्याचे महत्त्वाचे एक अंग आहे असे दिसून येते.

अर्थगौरव

श्रोता आणि वक्ता यांचे संबंध कसे असावे हे सांगत असताना श्रीधर म्हणतो —

वक्त्याचे वाग्बाण अत्यंत ।
अर्थगौरव मुख लखलखित
पद्यरचना पक्षमंडित ।
सुरंग मिरवत साहित्य ॥

रा. वि. ४ : १६

बाण हे जसे टोकदार आणि पिसांनी युक्त असून रंगीबेरंगी दिसतात त्याप्रमाणे वक्त्याचे शब्द हे अर्थगौरवपूर्ण असून त्याची पद्यरचना साहित्याचे लेणे घेऊन मिरवते.

याठिकाणी कवीने निर्माण केलेल्या पद्याची रचना ही पिसे लावलेल्या बाणाप्रमाणे असून शब्द आणि अर्थ यांचे साहित्य हे शोभिवंत दिसते, असे म्हणून अर्थगौरव हा श्रीधराने महत्त्वाचा काव्यघटक ठरविला आहे. पद्यरचना आणि अर्थाची थोरवी यांच्या संयोगापासून जे साहित्य बनते ते काव्याला खरी शोभा आणून देते. साहित्यशास्त्रदृष्ट्या अतिशय महत्त्वाचा असा विचार येथे श्रीधराने मांडलेला आहे.

चातुर्य आणि चापल्य

अर्जुन आणि कर्ण यांच्यामधील युद्धप्रसंग वर्णन करताना श्रीधर म्हणतो—

अमोघ धनंजयाचे बाण ।
सुटते जाहले चापापासून
जैसे चतुराचे मुखांतून ।
अपार शब्द निघती पैं ॥
कीं पदक्रमवर्णक्रमेंकरून ।
वैदिक करिती वेदाध्ययन
तैसे चपलत्वें अर्जुन ।
शर सोडी असंख्य ॥
कीं मेघापासून अवधारा ।
अपार पडती तोय गारा
कीं ओंकारापासून अपारा ।
ध्वनी जैशा निघती ॥
कीं मूलमायेपासूनि एकसरें ।
असंख्य जीवसृष्टि उभारे
की चपल लेखकापासून त्वरें ।
असंख्य अक्षरें उमटती ॥

पां. प्र. ४९ : ५९–६२.

अर्जुनाचे अमोघ असे बाण, एखाद्या चतुर माणसाच्या तोंडून निघणाऱ्या शब्दांप्रमाणे, धनुष्यापासून सुटत. पदक्रम–वर्णक्रमानुसार वैदिक माणूस वेदाध्ययन करतो. त्याप्रमाणे अर्जुन चापल्याने बाण सोडत होता. ज्याप्रमाणे ढगांमधून सतत पाण्याचा धारा पडाव्या किंवा ॐकारापासून अनेक ध्वनि निर्माण व्हावे किंवा मूळ मायेपासून ही असंख्य जीवसृष्टी उभी व्हावी त्याप्रमाणे लेखकाच्या ठिकाणी जर चापल्य असेल तर असंख्य अक्षरे तो निर्माण करील, असे उपमान श्रीधराने वापरले आहे.

अर्जुनाचे बाण सोडण्याचे चापल्य आणि लेखकाचे अक्षरे उमटविण्याचे चापल्य यांची तुलना करून

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असंख्य अक्षरे निर्माण करण्याचे चापल्य कवीच्या ठिकाणी असावे अशी अपेक्षा श्रीधराने व्यक्त केली आहे. अर्जुन हा जसा पुरुषश्रेष्ठ असून धनुर्विद्येत प्रवीण होता तसा लेखक हा वाङ्मयनिर्मिती करणारा श्रेष्ठ पुरुष असून त्याच्या ठिकाणी असंख्य अक्षरे निर्माण करण्याचे सामर्थ्य निश्चित असले पाहिजे असे श्रीधर या तुलनेतून सुचवितो.

'रामविजया'त लक्ष्मणाने रावणावर जो बाणांचा प्रहार केला त्याचे वर्णन करताना श्रीधर म्हणतो.

चपळ लेखकापासाव एकसरें
निघती अक्षरापासाव अक्षरें ।
तैसे बाण सुमित्राकुमरे ।
रावणावरी सोडिले ।।
रा. वि. ६ : १९२

या ओवीतही लेखक हा जर चपळ असला तर त्याच्याकडून अक्षरानंतर अक्षरे निर्माण होतील त्याप्रमाणे लक्ष्मणाने रावणावर बाण सोडले, असे म्हटले आहे.

दृष्टान्त, उत्स्फूर्तता, अर्थगौरव आणि चापल्य या गोष्टी काव्याला आवश्यक आहेत असे श्रीधराच्या निरनिराळ्या उद्गारांवरून दिसून येते. श्रीधराने मोठ्या मार्मिकपणाने दृष्टांतांची काव्यातील अपरिहार्यता, उत्स्फूर्तता व अर्थगौरव यांचे महत्त्व प्रस्तुत ओव्यांमधून दाखविले आहे. तसेच अर्जुन आणि लक्ष्मण यांचे बाण सोडण्याचे चापल्य आणि लेखकाचे काव्यनिर्मितीचे चातुर्य यांची तुलना केली आहे.

–२–

काव्याला आवश्यक अशा कोणकोणत्या गोष्टी आहेत हे पाहिल्यानंतर श्रीधराच्या काव्यनिर्मितीमागचा हेतू कोणता आहे हे बघणे आवश्यक ठरेल व त्यातून त्याचे काव्यप्रयोजन कोणते होते हे ठरविता येईल.

हरिगुणवर्णन

श्रीधर म्हणतो--

हरिगुणलीला न वर्णितां ।
व्यर्थ काय ते अलवण कविता
जैसा वाळूचा घाणा गाळितां ।
तेल न पडे काहीच ।।
नळी फुंकिली सोनारें ।
इकडून तिकडे जाय वारें
तैसी तीं व्यर्थ शास्त्रें ।
हरिलीला न वर्णितां ।।
न वर्णितां हरिचरित्र ।
व्यर्थ वटवट काय्से ग्रंथ
जैसी अर्कफळें क्षुधार्थ ।
रुचि उडे भक्षितां ।।
ह. वि. ९ : ३–५

हरिगुणलीला वर्णनाशिवाय कविता करणे म्हणजे वाळूचा घाणा गाळून तेल काढण्याचा प्रयत्न करण्यासारखे आहे. ते जसे व्यर्थ आहे त्याप्रमाणे हरिगुणलीला वर्णनाशिवाय असलेली कविता व्यर्थ होय. ती आळणी होईल. सोनाराने नळी फुंकल्याप्रमाणे हरिलीला वर्णनाशिवाय असलेली कविता वृथा ठरेल. भुकेलेल्या माणसाने रुईची फळे खाल्ली तर त्याची भूक तर शमणार नाही उलट त्याच्या तोंडाची चव देखील नष्ट होईल. त्याप्रमाणे हरिचरित्राचे वर्णन ग्रंथात नसेल तर तो ग्रंथ होणार नाही. उलटपक्षी ती वृथा वटवट वाटेल. अनेक उपमांच्या साह्याने श्रीधराने हरिगुणलीलावर्णन करण्यासाठी आपण काव्यनिर्मिती करतो असे सांगितले आहे.

वाचेचे सार्थक

हरिगुणलीलावर्णनाप्रमाणेच दुसरेही एक काव्यप्रयोजन श्रीधर सांगतो.

वाचेचे सार्थक करावे यथार्थ ।
म्हणोनि आरंभिले व्यास भारत
त्यातील सारांश यथार्थ :
अतुट कथा निवडिली ।।
पां. प्र. ४१:१४९

वाणीचे सार्थक यथार्थपणाने करण्यासाठी मी व्यासकृत महाभारत निरूपणासाठी घेतले. त्यातील सारांश सांगण्यासाठी मी पांडवांची अलौकिक अशी कथा निवडली आहे असे श्रीधर येथे म्हणतो. त्यावरून वाचेचे सार्थक करण्यासाठी काव्यनिर्मिती झालेली दिसून येते. वाचेचे सार्थक करणे हेही त्याचे एक उद्दिष्ट आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्रोत्यांचा संतोष

हरिगुणलीला वर्णन करणे आणि वाचेचे सार्थक करणे हे दोन उद्देश जसे श्रीधरापुढे होते तसेच आणखी काही होते की काय यांचा शोध घेऊ.

कवीची शब्दरत्नमांदुस।
उघडितां पंडित पावती संतोष
इतर कुबुद्धि मतिमंदांस।
रत्नपरीक्षा न कळे हो ॥
रा. वि. १२ : १५४

कवीने निर्माण केलेली शब्दरूपी रत्नांची पेटी पंडित श्रोत्यांसमोर उघडताच ते संतोष पावतात, आनंदी होतात. पण इतर जे निर्बुद्ध असतात त्यांना या रत्नांची परीक्षा करिता येत नाही. येथे कवीने काव्य-परीक्षा करणारे जे पंडित श्रोते असतात त्यांना संतुष्ट करावे असे आपले उद्दिष्ट व्यक्त केले आहे. श्रीधराच्या या उद्गारावरून कालिदासाच्या शाकुंतलातील "आपरितोषाद्विदुषां न साधु मन्ये प्रयोगविज्ञानम्" या प्रसिद्ध वचनाची आठवण होते.

हरिगुणलीला वर्णन करणे, वाचेचे सार्थक करणे आणि विद्वान श्रोत्यांचा संतोष संपादन करणे ही श्रीधराच्या काव्याची प्रमुख प्रयोजने असलेली आढळून येतात.

-३-

काव्याला आवश्यक गोष्टी कोणकोणत्या आणि काव्यनिर्मितीमागचा हेतू कोणता, यांचा श्रीधराने काढलेल्या उद्गारावरून मागोवा घेतल्यानंतर श्रीधराच्या काव्यनिर्मितीमागे कोणकोणती कारणे आहेत हे बघावयाचे आहे.

ईश्वरी आज्ञा

'पांडवप्रताप'त कृष्णशिष्टाईवर भाष्य करताना श्रीधर म्हणतो,

या ग्रंथाचा कर्ता निश्चित।
स्वयें असे पंढरीनाथ
तो जे जे शब्द सांगत।
ते ते एथ लिहिले म्यां ॥
तो सांगेल तेंच करावें।
बोलेल तेंच पत्रीं लिहावें
तो न सांगे तरी बैसावें।
उगेंच लेखनी घरोनियां ॥
पां. प्र. ३९ : २३५, २३६

या ग्रंथाचा कर्ता स्वत: ईश्वर असून तो जे जे शब्द सांगतो तेच मी लिहिले आहेत. तो सांगेल तेच करावे, बोलेल तेच लिहावे. त्याने काही सांगितले नाही तर स्वस्थ बसावे. म्हणजे ईश्वराने प्रेरणा दिल्याशिवाय काहीही लिहू नये असे म्हणून काव्य-निर्मितीमागचे प्रमुख कारण ईश्वरी आज्ञा होय, असे श्रीधराचे मत दिसून येते.

श्रीधरवरदा रुक्मिणीवरा।
ब्रह्मानंदा विश्वंभरा
भीमातीरवासा दिगंबरा।
पुढे रचना बोलें कैसी ॥
तूं जें सांगसी मम श्रोतीं।
तेंच लिहितों कागदपत्रीं
तुझ्या वचनाशिवाय अन्य पंक्तीं।
नाही लिहीत पांडुरंगा ॥
पां. प्र. ५६ : १९५, १९६

ईश्वराच्या आज्ञेशिवाय मी अन्य एकही ओळ लिहीत नाही असे श्रीधर म्हणत असून ईश्वर सांगतो आणि मी लिहितो अशी त्याची भूमिका आहे.

सरस्वती हीच स्फूर्ती

पांडवप्रतापाच्या मंगलाचरणात श्रीधर सरस्वतीला वंदन करताना म्हणतो—

वंदू कमलोद्भव कुमारी।
जे वर्षे शब्दसंभारी
जे ज्ञानगंगा स्वानंदलहरी।
ब्रह्मानंद-सागरीची ॥
जे सदा विलसे कविजिव्हाग्री।
जे त्रिभुवन-लावण्य-सुंदरी
साहित्यकल्हार-भ्रमरी।
जे सुरासुरीं वंदिजे ॥
पां. प्र. १ : १२, १३

कमळातून जन्म झालेल्या सरस्वतीचे वंदन करू. ती शब्दसमूहाचा वर्षाव करणारी आहे. ती ज्ञानाची गंगा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असून ब्रह्मानंदरूपी सागराची स्वानंदरूपी लहरी अर्थात् स्फूर्ती आहे. कवीच्या जिभेवर ती नेहमी राहाते. ती त्रैलोक्यातील रूपसुंदरी व साहित्य-शास्त्ररूपी कमळावर विहार करणारी भ्रमरी असून देवदानवांनी तिला वंदन केले आहे.

शब्दांचा वर्षाव करणारी सरस्वती ही कवीच्या जिभेवर विलसत असते. असे श्रीधर म्हणतो यावरून सरस्वतीचा कृपाप्रसाद म्हणजेच कविता निर्माण करण्याची शक्ती अर्थात् प्रतिभा ही कवीच्या ठिकाणी असते. आणि तिच्यामुळे शब्दांचा वर्षाव करण्याचे सामर्थ्य कवीच्या ठिकाणी निर्माण होते. साक्षात् सरस्वती कवीच्या जिभेवर असल्यामुळेच तो उत्स्फूर्ततेने काव्यनिर्मिती करू शकतो.

घडामोड

'रामविजया 'त श्रीधर म्हणतो,

कवीची घडामोड बहुत ।
युक्तिसागरीचीं रत्नें काढीत
एक गव्हाचे प्रकार बहुत ।
करी जैशी सुगरिणी ।।
एके मृत्तिकेचे घट अपार ।
एका तंतूचे पट विचित्र
एक हेम बहुत अलंकार ।
हाटकघडणार करी जैसा ।।
एके काष्ठीं शिल्पकार ।
युक्ति दाखवी अपार
तैसा जो कवि चतुर ।
शब्दसाहित्य विवरी ।।

रा. वि. ४: २२, २४

'घडामोड' या एका शब्दातून श्रीधर कवीने करावयाचे परिश्रम सूचित करतो. जो कवी चतुर असेल तो परिश्रमांच्या म्हणजेच अभ्यासाच्या साह्याने शब्दसाहित्याचे विवरण करील.

ईश्वरी आज्ञा, स्फूर्ती आणि घडामोड या तीन शब्दांतून श्रीधराने काव्यकारण व्यक्त केले आहे. काव्य का निर्माण झाले ?—असा प्रश्न केल्यास श्रीधराच्या उद्गारातून त्याचे उत्तर वरीलप्रमाणे मिळते.

खास आपल्यासारख्या काव्यरसिकांसाठीं मराठीतील उत्कृष्ट अशा नव्या कवींचा परिचय करून देण्यासाठी

नवे कवी : नवी कविता

ही योजना आखण्यात आली आहे.

योजना ह्या योजनेत पहिले दोन संग्रह ग्रेस (संध्याकाळच्या कविता) आणि ना. धों. महानोर (रानातल्या कविता) प्रसिद्ध होत आहेत. दरवर्षी चार संग्रह प्रसिद्ध होतील. प्रत्येक संग्रहाची किंमत अंदाजे तीन रुपये

सभासद फक्त दहा रुपये भरून ह्या योजनेचे वार्षिक सभासद होता येईल. सभासदांना वर्षातील चारही संग्रह घरपोच मिळतील. शिवाय पॉप्युलर प्रकाशनातर्फे प्रकाशित होणारे कविता संग्रह पोस्ट खर्च माफ मिळतील.

नोंदणी स्थळे पॉप्युलर बुक डेपो, पुणे २
बॉम्बे बुक डेपो, मुंबई ४
पॉप्युलर बुक डेपो, मुंबई ७

पॉप्युलर प्रकाशन
३५ सी ताडदेव रोड
मुंबई ३४ WB

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

—प्राचीन भारतीय चित्रण आणि साहित्यिक उल्लेख

—धनंजय नाकाडे

—भारतीय चित्रकारांनी काळ व निसर्ग यांना अत्यंत मोलाचे स्थान आमच्या भारतीय चित्रकलेत दिले असल्यामुळे भारतीयांच्या चित्रकलाकृती आगळचा वैशिष्टयांनी उठून दिसतात. भारतीय जनजीवनावर अधिष्ठित भारतीय चित्रकला पारंपारिक बंधनांनी जखडलेली असली तरी प्रगतीचे पुढील पाऊल मात्र ती टाकीत आहे. या सांस्कृतिक चित्रकलेची वाटचाल बऱ्याच काळपर्यंत धार्मिक बाबींवर आधारलेली होती; परंतु कालपरत्वे धर्माच्या कल्पना बदलत गेल्या आणि भौगोलिक, सामाजिक, राजकीय घडामोडींचा परिणाम अर्थातच कलावंतांच्या जीवनप्रवाहाप्रमाणे नागमोडी वळणांनी वळसे घेत घेत कलासंसारही प्रगतीच्या मार्गांनी प्रगल्भ होत गेला. आधुनिक चित्रकलेचे जे दुर्बोध रूप बघावयास मिळते ते या प्रगतीचेच एक विकसित असे अंग होय.

—भारतात मृगयावस्थेत रानटी टोळीवाले राहत असून पोटाकरिता त्यांना रानोमाळ वणवण भटकावे लागत असे. शिकार करणे हेच त्यांचे कर्म, यातून त्यांच्या मनात घोळत असलेली स्मृति–चित्रे म्हणजे जंगली जनावरे, श्वापदे आणि त्यांच्या शिकारीचे 'सावज' हेच त्यांच्या रोजच्या जीवनातील चर्चेचे विषय होते. जंगली सांड, बारशिंगे आणि मानवाकृती प्राणी हेच त्यांच्या चित्रकृतीतून प्रतिपादले जात होते. कारण ह्या अनुभूतीतून जन्म घेणारी अभिव्यक्ती निराळी ती काय असणार? असल्या चित्रांच्या कलाकृतींचे नमुने आज मिर्झापूर आणि सिहनपूर गुंफा चित्रात चितारलेली असल्याचे आढळून येतात. ही चित्रे कमीत कमी दहा हजार वर्षांपूर्वीची किंवा जास्तीत जास्त पंचवीस हजार वर्षांपूर्वीची असावीत असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. हा काळ चित्रणाच्या प्रथमावस्थेचा असावा कारण यात फारसा उत्कर्षाचा काळ दिसून येत नाही. प्रथमतः संरक्षणाची प्राथमिक जबाबदारी आणि पोटाकरिता प्राण्यांची शिकार करणे यांतून कलेला उत्तेजन मिळणे अशक्य; तरी पण ज्या विचारप्रणालीतून हे रेखाटन केले गेले, त्यात त्यांच्या आंतरिक भाव–भावना आणि इंद्रिये जे कार्य करीत होते व ज्या सहजप्रवर्तनी क्रिया घडत होत्या, त्यातूनच रेषा साकल्याने साकार पावल्या. अंतरमनाच्या चष्म्यातून दिसणारे द्वंद्व त्यात चित्रित करून रेखाटलेले दिसून येते व शिकार–तत्परतेची स्फूर्ती आणि चमक तळपत असलेली दिसते. थोडक्यात त्यांच्या शौर्याचा, पराक्रमाचा आणि धडाडीचा इतिहास त्यातून व्यक्त केला आहे. अनुभूतीच्या आणि अभिव्यक्तीच्या मर्यादा एका समपातळीच्या भूमिकेवरून जात असलेल्या दिसून येतात.

सैंधव संस्कृती ही आर्यांच्या आगमनापूर्वीची द्रविड संस्कृती. हा काळ सुमारे चार हजार वर्षांपूर्वीचा मोहिंजोदारो आणि हरप्पा येथील होय. ही अनार्य लोकांची स्वतंत्र अस्तित्व प्राप्त संस्कृती असल्यामुळे त्यात द्रविडांच्या जीवनाचे धागे–दोरे योग्य समन्वयाने गुंफून प्राचीन संस्कृतीत तिने आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. त्यांच्या कलाकृतींचे नमुने आजही बघावयास मिळतात. ही येथील मूळ रहिवाशांची निर्मळ जमात, रानटी असूनही त्यांनी सुधारणेचा बराच वरचा टप्पा गाठला होता. त्यांना पुष्कळ गोष्टींच्या कलेचे ज्ञान अवगत होते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांचे शास्त्रही जवळपास ठरले होते. त्यांना मातीची आणि धातूंची भांडी तयार करण्याची कला अवगत होती. त्यावर ते रंगांनी चित्रे चितारीत होते. तरी-पण त्या काळी चित्रकलेत फारशी सुधारणा घडून आलेली नसल्यामुळे पूर्वीप्रमाणे याही काळी प्राण्यां-चीच चित्रे अधिक रेखाटली गेली. हे त्यांच्या सापडलेल्या मुद्रा आणि नाण्यांवरून सिद्ध होते. त्यांना जीवनाचे शास्त्र अवगत होते हे नाकारता येणार नाही.

यानंतरचा काळ मात्र कसा काय गेला असेल हा एक गहन प्रश्न आहे. तीन हजार वर्षांचा हा फारच मोठा असा कालखंड या भारतात काहीतरी भरीव, प्रगत असे कार्य करीत असावा, पण आपणास ह्या अप्रकाशित काळाच्या प्रगतीची माहिती मिळत नाही. तरी पण कल्पनेप्रमाणे त्यांच्या बौद्धिक आणि सांस्कृतिक बाजूंबरोबर चित्रणाचीही बाजू प्रगती करीत असावी.

धार्मिक बाजूला जवळ करून चित्रनिर्मिती करण्याचा आणि धर्माच्या नावाखाली कलेला राब-विण्याचा काळ यावयाचा होता. या काळी भारत अविकसित राष्ट्र होते. गंगा-सिंधूपासून नर्मदा नदी-पर्यंतचा भाग आर्यांनी आपल्या बाहुबलावर नुकताच अमलाखाली आणला होता. यावेळी द्रविडाचा पाडाव झाला होता व आर्यांचा प्रभाव सर्व बाजूंनी दिसून येत होता. आर्यांची भाषा 'संस्कृत' होती. याच भाषेत त्यांनी आपले ज्ञानभांडार लिहून ठेवले होते. त्या वैदिक वाङ्मयात संस्कृत साहित्याच्या अनुरोधाने बघितल्यास त्या काळचे लोक आपल्या बुद्धीप्रमाणे घरांच्या भिंती, कोनाडे, दरवाजे, खिडक्या, खोल्या धार्मिक व सांस्कृतिक कार्याबरोबरच पूज्य भावनेने रंगवीत असत. सजावटीच्या कार्यात चित्र-णाला अत्यंत मोलाचे स्थान आजच्याप्रमाणे त्याही काळी प्रचलित पद्धतीप्रमाणे दिले जाई. आजही धार्मिक कार्यात आपण आपल्या प्रचलित सांस्कृतिक चित्र-कलेला चित्रणाची एक बाजू म्हणून उपयोगात आणीत असतो.

संस्कृत महाकाव्याच्या अनुरोधाने गेल्यास रामायणात किंवा महाभारतात चित्रशाळेचा उल्लेख केलेला दिसून येतो. विजयपताकांवर चित्रे चितार-लेली असत. यक्षाच्या पताकावर सुंदर निरनिराळी चित्रे होती. द्वारांवर, खिडक्यांवर, रथांवर मुद्रा किंवा चित्रे काढण्याची प्रथा अस्तित्वात होती. निरनिराळ्या स्वभावधर्माप्रमाणे त्यांच्या व्यक्तिगत आवडीनिवडी-प्रमाणे किंवा दैवताप्रमाणे चित्रे आवारलेली होती. जसे रावणाच्या रथावर पिशाच्चवदने चितारलेली होती, तर इंद्रजिताचा रथ सुवर्णविभूषित अर्धचंद्र व मृग यांनी अलंकृत केलेला होता. यावरून त्या काळी मानसशास्त्रीय विश्लेषणात्मक चित्रे आजच्या प्रमाणे चितारली जात असावी. सार्वजनिक व राजमंदिरातही चित्रशाळा होत्या असे वर्णन दिले आहे. धूम्राक्षाच्या रथावर मृग आणि सिंहाचे मुखवटे होते; तर रामचंद्राच्या राजप्रासा दात भित्तीचित्रे होती. कैकयीचा राजप्रासाद चित्रगृहाने युक्त होता. रावणाच्या पुष्पक विमानावर सुवर्णखचित चित्रकाम केले होते. जमिनीवर पर्वत-राजी होती, पर्वतावर वृक्षवल्ली होती. वृक्षावर पुष्पांचा बहर आणि पुष्पकेशर पाकळ्यांनी युक्त असे मनोरम दृश्य त्यावर चित्रित केले होते. त्याशिवाय अनेक कोरीव कामाचे अनेक नमुने पुष्पक विमानावर होते. ज्या शवपालखीतून रावणाचे शव नेण्यात आले होते, त्या पालखीवरही सुंदर पुष्पे चित्रित केली होती.

वात्सायनाच्या कामसूत्रात चित्रकलेचा उल्लेख आहे व त्यात त्यांनी बारिकसारिक चित्रे बनविण्याचे सिद्धांत व नियम सांगितले आहेत. भारतवर्षात पौराणिक काळापासून चित्रकलेचा उल्लेख संस्कृत साहित्यात आला आहे. वैदिक साहित्यात विश्वकर्मा सर्व कलेचा आविष्कर्ता मानला जातो पण चित्रकलेचा संबंध बाणभट्टाच्या कादंबरीत आला आहे. या कादंबरीची रचना सातव्या शतकातील असून सुप्रसिद्ध वाङमयीन कलाकृती आहे. त्या वेळी चित्रकलेचा प्रचार आणि प्रसार झाला होता. विद्यार्थी या कलेची सेवा करीत होते. राजपुत्रांना ही कला शिकविली जात होती. बाणाच्या साहित्यात चित्रकलेप्रमाणे शिल्पकलेचे नियम आणि शास्त्रीय मीमांसेची चर्चा केलेली आढळते. उज्जयनीच्या राजभवनातील परिसरात भित्तीचित्रांचे वर्णन केलेले आढळते. त्या काळी राजमंदिरातील स्त्रीपुरुषांचेही व्यक्तिचित्रण रेखाटले जात होते. येथील व्यक्तिचित्रणाला अधिक मोलाचे स्थान दिले जात होते. उत्तररामचरितात चित्रकलेची अधिक माहिती मिळते. मुद्राराक्षसामध्ये या कलेचा संबंध प्रस्थापित केला आहे. तर कालि-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दासाच्या नाट्यकलाकृतीत बऱ्याच प्रमाणात बऱ्याच ठिकाणी चित्रकलेची चर्चा केलेली आढळते. 'विक्रमोर्वशीय'मध्ये पुरूरवा उर्वशीच्या विरहाने व्याकूळ होतो तेव्हा उर्वशीचे चित्र विरहाचा भार कमी करण्याकरिता—काढण्याचा विचार पुरूरवासमोर येतो. शाकुंतलातही दुष्यंत विरहव्यथेत आपल्या प्रिय पत्नीचे चित्र रेखाटतो. उषा आणि अनिरुद्धाचा परिचयही अशाच चित्रणाच्या माध्यमातून केला जातो. त्या काळच्या चित्रणाचे किंवा चित्रशैलीचे नमुने उपलब्ध नाहीत. तरी पण आपणास चित्रकलेचे रूप बघावयास मिळते ते पहाडी–गुंफा चित्रांपासून ते अजिंठा, एलोरा, एलिफंटा, बागेश्वरी, कान्हेरी वगैरे गुंफाचित्रे प्रमुख आहेत. परंतु अजिंठा चित्रशैली आपले स्वतंत्र अस्तित्व प्रस्थापित करते. ती अत्यंत महत्त्वाची आणि सर्वांगसुंदर भारतीय चित्रकला समजली जाते. त्यात शारीरिक सौंदर्याकडे अधिक लक्ष दिले आहे.

भारतीय चित्रकला स्वतंत्र असली तरीही इतर कलांवर आधारित आहे. चित्रकला आणि नृत्यकला यांचा अविच्छेद संबंध असून त्याचा अभ्यास साकल्याने चित्रकाराला करून घ्यावा लागे. या दोन्हींच्या संगमाने त्यातून सरस, भावपूर्ण व शाश्वत रसपूर्ण कलाकृती निर्माण करण्याचे अनमोल कार्य घडत होते. नृत्यकलेशिवाय चित्रकलेची पूर्ती होत नव्हती. भारतीय चित्रकलेत एक विशेष खुबी होती. ती म्हणजे 'लय' निर्माण करण्याची. प्रत्येक प्रकारच्या अंग–संचलनात 'सुडौलपणा' आणि लयाबरोबर 'ताल' ह्या गोष्टी साधाव्या लागत. याकरिता नृत्याने आत्मसात झालेली एक बाजू चित्रकलेची लयबद्ध मांडणी करीत होती आणि भारतीय चित्रकलेतील महत्त्वाची दुसरी बाजू म्हणजे मानवी शरीर चितारताना वक्राकार रेषांनी निर्माण केलेल्या 'लय' कृतीमुळे मानवी शरीरावरील स्नायू नष्ट झालेले दाखविण्यात येत होते. यांनीच चित्रातील सौंदर्य अधिक साधले जात होते. चेहरा किंवा माणसाचा मुखवटा रेखताना याकडे कटाक्षाने लक्ष दिले जात होते. आनंद किंवा प्रेम व्यक्त करणारीच चेहऱ्याची ठेवण चित्रित केली जात होती. असले चित्र पाहून मनाला प्रसन्नता लाभावी व समाधान मिळावे म्हणून व्यक्तिचित्रणात चेहऱ्याचे रेखाटन वरीलप्रमाणे केले जात होते. दुःखाची छटा निर्माण होऊच नये म्हणून भावमुद्रा निराशाजनक किंवा दुःखी, उतरलेल्या मुखवट्याचा चेहरा चितारण्याची पद्धती अस्तित्वात नव्हती. हे अशा प्रकारचे आशावादी जीवनाचे तत्त्वज्ञान होते. निराशावादी जीवनाचा दृष्टिकोन भारतीयांच्या कलेत आतापर्यंतच्या काळात चितारलेला नव्हता. सुसंस्कृत, कलाभिज्ञ आणि सौंदर्यप्रेमी त्यावेळी होते. मोठ्या राजधानीच्या ठिकाणी 'कलाकेंद्र'हीं होते. अयोध्या नगर रामाच्या काळी कलाकेन्द्र म्हणून प्रसिद्ध होते तर उज्जयिनी नगर संस्कृत काव्यांत कलाकेन्द्राकरिता प्रसिद्ध आहे. त्याकाळी कलावंतांना आणि कलाकेन्द्रांना राजाश्रय दिले जात असून नागरिक त्यांचे भोक्ते होते. कलेत 'मनोरंजन' आणि 'व्यवसाय' असे दोन भाग पाडले होते. कलावंताला त्याकाळी 'शिल्पकार' म्हणत होते.

भारतीय चित्रकलेचे 'सुवर्ण युग' अजण्ठा चित्रकलेचा काळ मानण्यात येतो. या देशात हिंदू धर्माप्रमाणे बौद्ध धर्मीयांचाही प्रचार आणि प्रसार झाला व त्याला राजाश्रय मिळाला. धर्म आणि संस्कृतीवर अधिष्ठित भारतीयांची आध्यात्मिक बाजू उभारून प्रत्येक क्षेत्रात जीवनाचे नियम एका चाकोरीतून ठरले होते. म्हणजे ती बाजू उपयुक्ततेच्या दृष्टिकोणातून जीवनाला आगळे वळण लावणारी आध्यात्मिक बाजू होती आणि म्हणूनच ती उपयोगात आणली जात होती. अजिंठा-लेणी-चित्रे याच भारतीय सिद्धान्तावर आधारित आहेत. अशोकाने कलावंतांना राजाश्रय देऊन धार्मिक बाजूबरोबरच राजकीय क्षेत्राची व सामाजिक जीवनाची वागडोर बळकट केली. अजिंठा चित्रणात हेच दाखविले आहे. नाग जातीच्या चित्रकारांकडून हे काम करविण्यात आले. धर्म, काम, अर्थ, मोक्ष आणि अध्यात्म ह्या जीवनाच्या बाजू याच संस्कृतीच्या भरवशावर विराजमान केली होतो. या विविध क्षेत्रांच्या बाजूचे दर्शन प्रामुख्याने त्यात घडते. यातील सौंदर्य आणि नाजुकता मन मोहून टाकते. जीवनाची कोमलता त्यात उठून दिसते. जीवनप्रवाहाच्या गुंतागुंतीचे गूढ प्रश्न तात्त्विक विचारसरणीच्या दृष्टिकोणातून सोडविण्यात त्यांनी यश मिळविले आहे. ह्या सरस, भावस्पर्शी, सौंदर्यसंपन्न, शाश्वत, रसयुक्त कलाकृती, आज अमर कलाकृती म्हणून वन्दनीय ठरल्या आहेत. एवढेच नव्हे तर त्या विलोभनीय असून अभ्यसनीय आहेत. संशोधनप्राप्त भारताच्या इतिहासात त्यांचे स्थान अनन्यसाधारण आहे. म्हणून भारतीय चित्रकलेने केलेल्या अतिउत्तुंग प्रगतीचे हे 'सुवर्णयुग' असून कला आणि जीवन यांची सांगड मोठ्या बौद्धिक कौशल्याने घालून कला सार्वभौम असून जीवनाकरिता आहे हे बऱ्याच काळापूर्वी सिद्ध करून दाखविले आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आदरांजली—

'मधुमधुरा तव गिरा' : कै. बालगंधर्व

—मधुकर श्रीधर मंगरूळकर

"मानस काऽ बधिरावे" गडकऱ्यांच्या सिंधूला जो प्रश्न पडला होता तोच प्रश्न माझ्या मनाला पडला. नभोवाणीने बालगंधर्व कालवश झाल्याची बातमी जाहीर केली आणि माझे मन बधीर झाले. गेल्या कित्येक वर्षांतल्या घटना माझ्या नजरेसमोरून भराभर जाऊ लागल्या. मुख्य चित्रपट सुरू होण्यापूर्वी वार्तापट सुरू व्हावा तसे माझे झाले होते. बालगंधर्वांना मी प्रथम १९४०–४१ साली पाहिले. चिटणीसपार्कजवळील प्रि. पांढरीपांडे राहत असलेल्या पुरुषे यांच्या वाडयात नारायणरावांना भेटायला म्हणून आम्ही गेलो होतो. नारायणरावांच्या तुळतुळीत डोक्यावर औषधाची पट्टी लावलेली दिसत होती. आम्ही विचारले, "नाना, काय झालं तुमच्या डोक्याला—" नाना हसून उद्गारले "काय सांगू देवा! काल रात्रीच्या प्रयोगात अर्जुनाचे हातची तरवार लागली—" मी म्हटले, "नाना, नागपूरकरांवरचा राग बऱ्याच वर्षांनी गेलाऽ ना—?" "मी, आणि–रागावणार ? छे छे! देवा! तुम्ही आमचे अन्नदाते, देवाऽ! नागपूरकर सुजाण आहेत! रसिक आहेत!! कालचा प्रयोग फुल्ल गेला. आम्ही जिंकली..." नाना हसून म्हणाले. उतार वयातही त्यांच्या सौंदर्यानी आम्हाला जणू मंत्रमुग्ध केले होते. हे खंडार पाहून वाटले एकेकाळी ही इमारत किती बुलंद असावी! लहानशी तोकडी चड्डी आणि मलमलचा अर्ध्या बाह्यांचा अंगरखा हा पोषाख. पण हास्य कसं प्रसन्न! लहान मुलांच्या निर्व्याज–सहज सांडणाऱ्या स्मितासारखं..... अहंकाराचा लवलेश नाही—लोकांना नाटक आवडले. याचे समाधान विलसत असलेले......हीच नम्रता त्यांचेजवळ शेवटपर्यंत होती......

महाराष्ट्राने ज्या अनेक गोष्टी आपल्या संस्कृतीचा वारसा म्हणून जोपासल्या आहेत, त्यात बालगंधर्वांचा समावेश करावा लागेल. महाराष्ट्रीय स्त्रीचा आविष्कार त्यांच्या इतका अधिकारवाणीने दुसरा कुणीही केला नसेल. एक अशिक्षित मुलगा! पण केवळ ईश्वरी देणगीमुळे अभिनय–सम्राट होईल असे त्यांच्या आईलाही स्वप्नात वाटले नसेल. नारायणरावांना अभिनयाचा वारसा नाही म्हटले तरी थोडासा होताच. त्यांचे शालेय शिक्षण जळगावला आत्याकडं झालं. आत्याचे यजमान आबासाहेब म्हाळस हे नाटकांचे आणि संगीताचे भोक्ते होते. नानांचे वडील सतार वाजवीत असत. तसे म्हटले तर आजच्या गायन शाळांच्या जमान्यात घरोघरी संगीत पाणी भरीत आहे. आणि लहानपणच्या संस्काराने खरोखरच जर गायक निपजले असते तर, सर्व स्त्रीलिंगी प्राणी लता मंगेशकर आणि पुरुष निदानीचे दर्दभऱ्या आवाजात गाणारे महमद रफी निर्माण झाले असते. पण तसे होत नाही म्हणूनच बालगंधर्वांसारखा सहजासहजी न गवसणारा हिरा हरपला म्हणजे आम्हाला हळहळ वाटते.

नारायणराव जर गवंडी झाले असते तर! हा विचारच माझ्या मनात घर घेत नाही. कारण गाण्यामुळे आणि गोंडसरूपामुळेच त्यांचे नाटक कंपनीत आगमन झाले. त्या काळी स्त्रीपार्टी नटाचे तोंड पाहाणेही अशुभ समजत. लोकमान्य टिळक,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्री. दादासाहेब खापर्डे या मंडळींना, त्यांच्या माता-पितरांना, नारायणरावांना नाटक कंपनीत घाला म्हणून आग्रह करण्याचा हव्यास झाला याबद्दल सारी मंडळी त्यांची ऋणी झाली आहेत. गु. भास्कर बुवा बखल्यांसारख्या चतुरस्र कलाकाराच्या हाताखाली त्यांची मेहनत सुरू झाली होती. मास्तर कृष्णराव व नारायणराव एकाच वेळी तालिम घेत. पण भास्कररावांनी त्यांच्या गळ्याचा धर्म ओळखला होता. त्यांच्या आवाजाला पल्ला नव्हता. पण निरागस बाळाचे, नजर लागणारे बाळसे होते. त्यांच्या गोडीची तुलना काय करावी ! साखरेच्या गोडीला उपमा द्यायला दुसरी कुठली गोड वस्तू शोधायची. त्यांच्या आवाजाला जबाब नव्हता. वर्णोच्चार किंचित बोबडा, हळवा ! त्यांच्या वाणीमध्ये जणू व्यंजने कठोर शब्दच नव्हते. मी तर म्हणेन की नारायणरावांची गद्य भाषणे-स्वगत ही एकप्रकारची संगीत पदेच होती. त्यातही लय होती, स्वर होता, नाद होता. हळूहळू उकलणाऱ्या लोकरीच्या गुंडाळ्यासारखी मृदुता होती. 'स्वयंवरा'तील त्यांची पहिलीच एंट्री किती रुबाबदार असे. 'दादाऽऽ मी आले नाऽऽ दाऽऽ दाऽऽ—' नारायणरावांच्या तोंडी पुन्हा पुन्हा घोळणाऱ्या त्या ओळी ज्यांनी ज्यांनी ऐकल्या असतील त्यांना माझ्या म्हणण्याचा आशय पटेल. त्या शब्दकाव्याच्या किती तरी भावना व्यक्त होत होत्या, हरिणीची भिरभिरती नजर, भ्रमराची चंचलता, वाऱ्याची तरळता, आनंदाने थुई थुई उडणारे कारंजे जणू अंगा प्रत्यंगातून उतू जात आहे. 'दाऽऽदा' या शब्दामधील अवग्रहावरील यांचे किंचित विसावणे '···अरे···मी केव्हाची···आले आणि तुला त्याची दादही असू नये ना ! दाऽऽदा कसाऽरेऽऽ तू···ऽऽ' ही भावना···ती स्वतःची ओळखही किती ठसक्यात करून देते आहे पहा.

"अहोऽऽ रुक्मिणीऽरुक्मिणीऽऽ म्हणतात नाऽऽ ? तीऽऽ मीच ! मीऽऽच बरे ती रुक्मिणी...ऽऽ मीच ती ही कृष्णाची पट्टराणी कळलं ना"

किंवा "खडा मारायचा झाला तर..." या अमर स्वगतातील त्यांचा उत्कृष्ट अभिनय हे त्यांच्या गद्य-संगीताचे नमुने. त्यांच्या उतारवयातील अभिनय आम्ही पाहिला, म्हणून काय आम्हाला कसेसेच वाटले ? छेः अहो, तीच निरागतता, तीच बालिशपणा. रुक्मिणी, भामिनी, सुभद्रा, या १९११ नंतरच्या ऐन उमेदीत रंगमंचावर आल्या, त्या जणू तशाच होत्या. चिरंजीवी चिरयौवना होत्या. त्या लावण्याच्या मागे अदृश्य लावण्याचा अशरीरी पडदा होता. ती रुक्मिणी, ती सुभद्रा, जर म्हातारी दिसली असती, तर मग नारायणरावांचा मोठेपणा कुठून राहिला असता ? आम्ही १९४०-४१ साली ऐन उमेदीमधले १९११-१२ मधले नारायणराव पाहिलेत असे !

—ही कथा होती त्यांच्या गद्य भाषणांची. साथसंगत नसलेले ते गाणे ! मग तबलानवाझ थिरकवा साहेब, सारंगिये खांसाहेब कादरबक्ष, आणि आर्गनवादक श्री. वालावलकर यांच्या साथीत संगीत किती रंगायचे, ते सुख अनुभवायलाच हवे. सांगून तृप्ती होणे कठीणच. गंगेचे पवित्र पाणी फारच मधुर असे वर्णन करून तृषार्ताची तहान शमणार आहे काय ? हे सारे कलावंत नारायणरावांच्या गळ्याचे जणू अविभाज्य अवयवच होते. एकाशिवाय दुसऱ्याला पूर्णत्व नाही. त्री-मुखी दत्तात्रेयासारखी-मूर्तीसारखी. सारेजण मिळून एक स्वरयंत्र. नारायणरावांचे गाणे सुरू झाले म्हणजे वाटे बंद होऊच नये...आठवण करा. फाटकी लक्तरे घालून सिंधू रंगमंचावर उभी आहे. दैवाच्या दुर्गतीमुळे अनेक कोप तिच्यावर होत आहेत. दीनांचा कैवारी जो प्रभू तोच जर आपल्यावर कोपला, तर कुणाच्या आश्रयाला जावे. ही भावना चेहऱ्यावर-रंगमंचावर पुढे येऊन नारायणराव गात आहेत...ऐका...

...आर्गनचा मंद स्वर चालू आहे. रंगमंचावर मंद प्रकाश जणू निश्चल आहे. आर्गनचे खर्जातल्या स्वरांमुळे दुःखाचे वातावरण निर्माण होत आहे. एकाएकी साद घातल्या जात आहे.

...दयाऽऽ छाऽऽया घेऽनिवारुनिया

त्या ओळींचे तोंड तरी किती गोड आहे. तार सप्तकातील षड्जावर 'दया'मधील 'या' चा आवाज मनात कालवाकालव उत्पन्न करतो...व त्या तार षड्जावरून 'निवारुनिया'मधील 'या' चा मुक्काम 'ऋषभा'वर ! हृदयातील कळ एकदम जरा कमी झाल्यासारखी वाटते..आणि नंतर "प्रभूऽऽ मजवरीऽऽ कोपला..." या ओळीतील 'ला' यावर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सम धरून थिरकवासाहेब आपल्या डग्ग्याच्या धीरगंभीर आवाजात जणू ते धृवपद उचलून धरीत आहेत. एकदा समेवर हुंकार दिला की शिवूच्या मनातील दुःखाचे कढ त्या तबल्यातून निघायचे "ऽऽहोऽऽहो ! प्रभू खरंच माझ्यावर कोपला...आर्ग-नचे खर्जातले सूरही तेच शब्द उचलायचे आणि सारंगी जणू मूक रूदन केल्यासारखी, मुकाट्याने आसवं ढाळीत असलेली, बारीक सुरात मागोवा घेत अस-लेली, नारायणरावांच्या गळ्यातील स्वर केव्हा तुटला आणि सारंगीचा कढ केव्हा सुरू झाला हेही लक्षात येऊ नये.

'हे तर झाले दुःखाचे गाणे. पण नारायण. रावांचे कौशल्य पाह्यचे असेल तर 'स्वयंवर' बघा-एकेक गाणे म्हणजे नवरत्नांचा हार आहे. त्या हाराची लांबी कमी करता यायची नाही. आपल्या प्रियकराच्या आठवणीत प्रणयिनीच्या मनात कशा गुदगुल्या उठतात पाह्यचे आहे ? ऐका...रुक्मिणी गाते आहे. करीनऽऽ। यदुमनिऽ सदना। रुचिर सदन पतिमन सतीनाऽ। करीनऽऽ—पतीच्या मनात आपल्या आठवणींनी घर करून राहावं यापेक्षा प्रियेची काय इच्छा असणार. सुख ते काय त्यापुढं ?...'मम सुखाची...ठेव देवाऽऽ तुम्हापाशी ठेवा.' ही तिलक कामोदातली चीज, खाँसाहेबांच्या साथीत किती डौलाने उठत असे हे आम्ही काय सांगावे ! गायन शाळेत यमन कल्याण राग सगळ्यात प्रथम शिकविला जातो. म्हणून तो फार सोपा समजतात. (आणि म्हणून पुष्कळ गायक 'यमन काय गायचा असे म्हणतात.') नारायणराव गात असता "नाऽऽथ हा माझाऽ मोही-खला। शिशुपाला भारी झाला—' कोल्हापूरच्या थिएटरमध्यें ही चीज ऐकण्याठी खाँसाहेब अल्लादियाखां साहेब येऊन बसत आणि म्हणत, 'बेटा, देवानं तुला खूप आयुष्य द्यावं.' एका सम्राटाने दिलेली ती प्रशस्ती होती.

भिमपलासासारखा राग अती गोड, कोमल गांधार व कोमल निषाद या दोन्ही कोमल स्वरांनी तो नटलेला. शुद्ध निषाद तर वर्ज. शास्त्रकार सांगतील शुद्ध निषाद लावला तर तो भिमपलास नव्हेच. पण काही काही सुगृहिणींच्या हाताला 'पाका'ची देणगी असते. एखाद्या गोड पदार्थाला न कळत लवणाची अशी काही चव लावून देतील की ती गोड चव देखील नवीन रूप घेऊन जन्माला यावी. नारायणरावांचे असे होते. आरोहात असो किंवा अवरोहात असो निषादाला शुद्ध स्वरांचा ते असा काही सहज स्पर्श करीत की त्या लोखंडाचे सोने व्हावे. अलादियाखांसारखे कर्मठही आपल्या हातांनी कानाची पाळी पकडून म्हणत. 'बेटा ! खुप रहो ! तुझे सारे खून माफ हो !'

गंधर्वाच्या त्या काळात आजच्यासारखे गोवडी शिवणारे संगीत-दिग्दर्शक नव्हते. ज्यांनी संगीतासाठी आपल्या हाडांची काडे केली आहेत असे जाणकार होते. भास्करबुवा, वझेबुवा, गोविंदराव टेंबे व मास्तर कृष्णराव यांच्यासारखे सिद्ध गायक चाली बांधीत असत. बांधणे म्हणण्यापेक्षा वातावरणाला योग्य चिजा शोधून काढायच्या आणि त्यावर पदे बांधा-यची. मानापमान, स्वयंवर, एकच प्याला ही नाटके अजरामर झाली ती त्यातील संगीतामुळेच! बाल-गंधर्वांचा अभिनय आणि त्यांचे संगीत. त्यांच्या भूमिका स्टँडर्ड झाल्या. इतरांच्या निव्वळ नकला—त्या पूर्णत्वा-जवळही कोणी जाऊन पोचले नाहीत. गंधर्वांचे अनेक अवतार अवतरलेत या भूमंडळावर. पण बालगंधर्व एकच. इतर अनेक गंधर्व झालेत. पण यांची सर कुणालाच आली नाही.

'इतनाऽऽ संदेसवा मोऽऽरा' या यमनातील चिजेवर बांधलेली 'नयने लाजवीत' ही झपतालातील चीज किती डौलात गायल्या जात होती. 'जणूऽऽ धैर्यऽऽधर धैऽऽर्य धरीत, घन हाऽऽ समघनाऽऽ—' या या ओळीतील 'घ' या शब्दावर दहा मात्रांचा झप-ताल कसा कसा डौलदार चाले. खाँसाहेब म्हणायचे गाणे नारायणरावांचे ! माझे काम फक्त संगत करा-यचे. नारायणराव म्हणत असतील. वाऽऽवा काय सुरेख सम येतीय— बढो खाँसाहेब मी लहेरा धरतो थोडा वेळ—' असे हे सहजीवन !!

नारायणरावांनी भामिनी, सुभद्रा, रुक्मिणी अशा एकाहून एक सौंदर्यदेवता रंगभूमीवर उभ्या केल्या. राजघराण्यातल्या वेषभूषेसाठी, गोविंदराव टेंब्यां-सारख्या रसिक दृष्टीच्या कलावंतापुढे, बडोद्याचा—सयाजीरावांच्या सुनांचा कपडेपट उघडा झाला होता. नुसत्या साड्या डोळ्यांनी पाहून नव्हे. तर आजकाल

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

फॅशन परेड होतात त्याप्रमाणे त्या राजस्नुषा त्या त्या साड्या नेसून गोविंदरावांना दृष्टिसुख देत. उलट धरलेल्या गुलाब कळीची उपमा गोविंदरावांनी त्या नितंब आकाराला मोठ्या सार्थपणे दिली आहे. ही श्रीमंती नारायणरावांनी आपल्या नायिकांच्या हौसेसाठी साजशृंगारासाठी खर्च केली. आपल्या अंगाच्या अत्तरांचा वास पिटातील प्रेक्षकाला यावा म्हणून भामिनी रंगभूमीवर येताना आपल्या अंगावर कनोजच्या अस्सल हिन्याची बाटली ओतीत असे. आणि भामिनीचा प्रवेश होण्यापूर्वी रंगपटात सर्वजण विंगमध्ये गर्दी करून उभे राहत, कशासाठी ? तर नारायणरावांच्या अंगाचा सुवास घेण्यासाठी.

पण ही सारी श्रीमंती त्यांनी आपल्या अंगात आणली नाही. किंबहुना श्रीमंत असूनही नाना साधेच होते. त्यांनी प्रकट केलेली भामिनी, रुक्मिणी, सुभद्रा सुंदर होती, सुडौल होती, यौवनाने मुसमुसलेली होती. पण त्यातही गर्तेपणा होता. त्या सौंदर्यात मादकता तर होतीच पण, छचोरपणा नावालाही नव्हता. हिर्मुजी मोत्याचे तेज होते. त्यांची रुक्मिणी म्हणेऽऽ—सुखविलासीऽऽ सोडीऽन विनयाऽऽ हे त्यांचे ब्रीद होते.

सिनेनट वापरतात त्या कपड्यांची फॅशन समाजात सुरू होते. नारायणरावांनी हा मान पूर्वीच मिळविला. त्यांनी नाटकात एखाद्या नवीन किनारीची साडी नेसली की तशीच किनारी असलेल्या साड्यांची एकदम मागणी येत असे. गंधर्व टोपी तर अगदी अलीकडेपर्यंत वापरण्यात होती.

...झाले, ते सारे स्वप्न संपले, एका मोठ्या युगाची समाप्ती झाली. आपले हाल इतरांनी पाहून त्यांना झालेले दुःख पहाण्याचे कटु कर्तव्य आपल्या नशिबी येऊ नये म्हणूनच जणू काय त्यांनी शंभर दिवस डोळे मिटून ठेवले होते, ते अखेरीपर्यंत ! 'अवघाची' संसार त्यांनी शेवटपर्यंत सुखाने केला. वारकऱ्याच्या अभिनिवेशाने, जोपर्यंत सर्व आले तोपर्यंत त्या सर्वांना घेऊन व शेवटी एकटेपणाने. .

पण ते आमच्या अंतरात आहेत. ज्ञानेश्वर माऊलींनी म्हटल्याप्रमाणे—' हा हा विराट ज्ञानी

सुमन वेणु चराचर भुवनि
कणकण बरसे—'

त्याची मधुमधुरागिरा चिरंजीव आहे. बालगंधर्व अमर झाले. प्रत्येक रसिक हृदयात कायमचे—कान्होपात्रा प्रभुपदी लीन झाली पण आमच्या मनी बसली कायमची. त्या आठवणी आता काढायच्या. आणि जुन्या स्मृतींना उजळा द्यायचा येवढेच आमचे हाती उरले आहे.

—निसर्गातील त्रुटी भरू काढण्याची सर्व जबाबदारी कलेवर असते.

—स्वतःच्या अनुचित करणीच्या बचावासाठी विचारशक्तीचा आणि आपले वाईट विचार दडविण्यासाठी शब्दांचा उपयोग करण्यात येतो.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीची पाठ्यपुस्तके

—प्रा. म. बा. कुंडले

मागील प्रकरणात अभ्यासक्रमाची चर्चा केली. मराठीच्या अध्यापनाचे दुसरे महत्त्वाचे साधन पाठ्य-पुस्तके हे होय. या लेखात त्याविषयीच चर्चा करावयाची आहे. प्रारंभीच्या लेखात मराठीच्या अध्यापनाच्या प्रचलित स्वरूपाचे दोषदिग्दर्शन करताना एका मुद्यावर विशेष जोर दिला होता. व तो म्हणजे आजचे मराठीचे अध्यापन हे पाठ्यपुस्तककेंद्री (Text-book-centred) बनले आहे. शिक्षक मराठी भाषा शिकवीत नाहीत केवळ मराठीचे पुस्तक शिकवितात हा मुद्दा. या संदर्भात मराठीच्या पाठ्य-पुस्तकांवर एक स्वतंत्र लेख लिहिणे हे सकृद्दर्शनी जरा विसंगत वाटेल. परंतु विचारांती तसे वाटण्याचे काही कारण नाही. पाठ्यपुस्तक म्हणजे विषयसर्वस्व नव्हे हे खरे असले तरी प्रत्येक विषयात पाठ्यपुस्त-कांची गरज असतेच. भाषा-विषयात तर इतर कोणत्याही विषयापेक्षा अधिक असते. भूगोल, इतिहास, विज्ञान आदी विषयांचे शिक्षक त्या त्या विषयातील नेमलेला भाग पाठ्यपुस्तकाचा उपयोग न करता वर्गात शिकवू शकतात. विद्यार्थ्यांना पूरक अभ्यासा-साठी पाठ्यपुस्तकांचा आधार घ्यावा लागतो. परंतु भाषेमध्ये मात्र पाठ्यपुस्तकाचाच अभ्यास करावा लागतो. शिक्षकाला प्रत्यक्ष पुस्तकच वर्गात शिकवावे लागते. भाषा विषयात पाठ्यपुस्तक हे अध्ययन-अध्यापनाचे पूरक साधन नसून ते एक अनिवार्य साधन आहे. भाषेत पुस्तकच शिकवायचे असल्यामुळे ते सदोष असल्यास त्या दोषांचा परिणाम विद्यार्थ्यांवर होणे अटळ असते. म्हणून भाषेचे पाठ्यपुस्तक शक्य तितके अधिक निर्दोष असणे फार आवश्यक आहे.

भाषिक उद्दिष्टे

या दृष्टीने मराठीच्या अध्यापनात मराठीच्या-पाठ्यपुस्तकांची चर्चा हा अत्यावश्यक विषय आहे. एवढेच नव्हे तर ही पाठ्यपुस्तके जास्तीत जास्त निर्दोष कशी राहतील याचाही चिकित्सकपणे व अतिशय काळजीपूर्वक विचार करण्याची गरज आहे.

सर्वसाधारणतः पाठ्यपुस्तक तयार करावयाचे म्हटले की, मराठीतील काही प्रमुख लेखक निवडून त्यांचा एखादा प्रमुख लेख वा कविता निवडणे, वाङमयाच्या निरनिराळ्या प्रकारांच्या एकेका लेखाचा अंतर्भाव करणे, ऐतिहासिक कालानुक्रमानुसार लेखांची व कवितांची मांडणी करणे, प्रारंभी लेखक-परिचय देणे, व शेवटी टीपा व स्वाध्याय देणे एवढ्या गोष्टी-वरच पाठ्यपुस्तकांचे संपादक आपले लक्ष केंद्रित कर-तात. पाठ्यपुस्तकनिर्मितीची ही सर्व बाह्य प्रक्रिया आवश्यक व इष्टच असली तरी तेवढीच पुरेशी नाही. त्याहूनही महत्त्वाची बाब आहे पुस्तकाचे अंतरंग-घडण, पुस्तकांतील वेच्यांची व कवितांची निवड. ही निवड मानसशास्त्र, शिक्षणशास्त्र, व भाषाशास्त्र यांच्या तत्त्वानुसारच व्हायला पाहिजे. त्या त्या इयत्तेतील विद्यार्थ्यांचे वयोमान, मानसिक व बौद्धिक पातळी,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांची शैक्षणिक व भाषिक गरज इत्यादी गोष्टी लक्षात घेऊनच हे निवडीचे कार्य झाले पाहिजे. काही संपादकांकडून तसा प्रयत्नही झाला आहे व होत आहे. परंतु पाठ्यपुस्तकांच्या प्रचलित मालांचे सखोल अध्ययन व विश्लेषण केल्यास हा प्रयत्न अपुरा आहे असेच म्हणावे लागते. अनेक लेखांची व कवितांची निवड शैक्षणिक व मानसशास्त्रीय तत्वांना धरून झाली नाही असे दिसून येते. ही पुस्तके वर्गात शिकविताना शिक्षकांना अनेक अडचणी येतात. त्यांना येणारा अनुभव हाही याबाबतीत विचारात घेणे अत्यंत आवश्यक आहे. हे सर्व लक्षात घेऊन मराठीचे पाठ्यपुस्तक कसे असावे, त्यातील वेच्यांची व कवितांची निवड कोणत्या कसोटचांवर करण्यात यावी, पाठ्यपुस्तकांची इतर उपांगे कोणती इत्यादी गोष्टींचा पुढे सविस्तर विचार केला आहे.

भाषिक व वाङमयीन मूल्यांना प्राधान्य

भाषेचे पाठ्यपुस्तक हे प्रामुख्याने 'भाषेचे'च पुस्तक असावे. म्हणजेच भाषा हीच त्यातील लेखांच्या निवडीची प्रमुख कसोटी असावी. ज्ञानदान किंवा विविध विषयांची माहिती देणे हा भाषेच्या पाठ्यपुस्तकाचा उद्देश नव्हे. विद्यार्थ्यांच्या भाषाज्ञानामध्ये भर पडावी, त्यांचे भाषिक सामर्थ्य वृद्धिगत व्हावे व त्याबरोबरच मराठी वाङमयाचा त्यांना परिचय होऊन त्या त्या वाङमयाच्या अभ्यासाची अभिरुची व आस्वादाची पात्रता त्यांच्यामध्ये निर्माण व्हावी ही आपली भाषेच्या पाठ्यपुस्तकापासून अपेक्षा असते.

प्राथमिक अवस्थेसाठी तयार केल्या जाणाऱ्या पुस्तकात नवनवीन शब्दांचा परिचय, व्यावहारिक दृष्टीने उपयुक्त अशा वाक्प्रचार व म्हणींची ओळख, संदर्भानुसार त्यांचे उपयोजन, विविध-प्रकारची वाक्यरचना, परिच्छेदरचना, मुद्देसूद, सुसंगत, सुसूत्र व आटोपशीर मांडणी, आकर्षक वर्णने इत्यादी घटकांवर भर राहील. पूर्वमाध्यमिक अवस्थेत हे घटक कायम ठेवूनही वाङमयीन पातळीवरील लेखनाला स्थान द्यावे लागेल. व उत्तर माध्यमिक अवस्थेत क्रमाक्रमाने वाङमयीन सौंदर्याची अभिव्यक्ती करणाऱ्या लेखांचे प्रमाण वाढवीत जावे लागेल. महाविद्यालयीन पाठ्यपुस्तकांची निर्मिती तर शुद्ध व उच्च वाङमयीन दृष्टिकोणातूनच व्हायला हवी.

हे तत्त्व मान्य केल्यास 'विजेतून सोने', 'व्यायाम', 'सहकारी पतपेढी', 'कागदाची कहाणी', 'जगदीशचंद्र बोस' असे धडे प्राथमिक इयत्तांच्या पाठ्यपुस्तकात घेणे कितपत योग्य ठरेल ? पूर्वमाध्यमिक अभ्यासक्रमातही 'मधमाशा व गांधीलमाशा' 'प्राणी व वनस्पती यांचे साम्य' या धड्यांचा पुस्तकात अंतर्भाव करण्याचे काय प्रयोजन ? हे धडे शुद्ध माहितीपर आहेत. त्यातून विद्यार्थ्यांच्या भाषिक अगर वाङमयीन विकासाला कोणत्याच प्रकारे चालना मिळण्याची शक्यता नाही. शिवाय शास्त्रीय माहितीने भरलेले हे धडे किचकट असल्यामुळे विद्यार्थ्यांना रोचक न वाटता उलट रुक्ष व कंटाळवाणे वाटतात. त्यापासून त्यांना कसलाही आनंद प्राप्त होत नाही.

चरित्राच्याही बाबतीत हेच खरे आहे. चरित्र हा एक महत्त्वाचा वाङमयप्रकार आहे हे मान्य. परंतु याचा अर्थ कोणत्याही जगदीशचंद्र बोस, मार्कोनी, एब्राहम लिंकन, रामानुजाचार्य अशा कोणाही शास्त्रज्ञाचे, तंत्रज्ञाचे वा तत्त्वज्ञाचे एखादे तरी चरित्र प्रत्येक वर्गाच्या पाठ्यपुस्तकात आलेच पाहिजे ही धारणा चुकीची आहे. निदान प्राथमिक अवस्थेत तरी या धोरणाचे कटाक्षाने पालन करण्याचे मुळीच कारण नाही. यावरही चरित्र घ्यायचेच ठरले तर ते निदान ज्यात विनाकारण शास्त्रीय व बोजड विषयाची चर्चा येणार नाही असे असावे. तसेच ते रसाळ व आकर्षक भाषाशैलीत लिहिलेले असावे. चरित्रनायक ही कीती थोर व्यक्ती आहे याला महत्त्व नसून ते कसे लिहिले आहे हे अधिक महत्त्वाचे आहे.

विद्यार्थ्यांची आकलनशक्ती व ग्रहणशीलता

धड्याची अगर कवितेची निवड भाषिक व वाङमयीन मूल्यांच्या कसोटीवर व्हावी हे निर्विवाद ! परंतु भाषा व वाङमयसौंदर्याने नटलेला कोणताही लेख कोणत्याही इयत्तेच्या पाठपुस्तकात अंतर्भूत करता येईल असे नव्हे. त्या त्या इयत्तेतील विद्यार्थ्यांचे वय, त्यांची बुद्धिमत्ता, त्यांची आकलनशक्ती व ग्रहणशक्ती, लक्षात घेऊनच ही निवड व्हावी. संतकवींचे अद्वैतपर तत्त्वज्ञान

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कितीही श्रेष्ठ असले तरी ते विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने समजेल काय, कितीही समजावून सांगितले तरी ते पचनी पडेल काय ? मागे 'मराठी गद्य' या पुस्तकात श्री. पु. य. देशपांडे यांचा 'तुकारामाचे काव्य' हा धडा होता. पदवीधरांनाही समजण्यास कठिण जातील अशा त्या धड्यातील कल्पना होत्या. त्या सर्व मॅट्रिकच्या विद्यार्थ्यांच्या गळी उतरवताना किती विलक्षण प्रयास पडत याचा मी स्वतः अनुभव घेतला आहे. 'डंका' या 'बी' कवींच्या कवितेत आपल्या समाजातील दोषांचे चित्रण ज्या पातळीवर व ज्या अध्यात्मिक परिभाषेत केले आहे ते, किंवा केशवसुतांच्या 'स्फूर्ती'मधील रूपकात्मक आशय हाही उत्तरमाध्यमिक अवस्थेतील विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अतिशय अवघड असा आहे. विनोबांच्या 'तीन मुद्दे' या निबंधातील पूर्वार्ध सुलभ असला तरी शेवटी लेखनातील शीघ्रता, सुंदरता व शुद्धता यांची गीतेतील कर्म, भक्ती व ज्ञान या योगांशी आणि सत्, चित व आनंद या आध्यात्मिक कल्पनांशी घातलेली सांगड इंग्रजी दुसऱ्या वर्गाच्या विद्यार्थ्यांना समजू शकेल काय ?

या संदर्भात पाठ्यपुस्तकनिर्मितीत अवलंबिल्या जाणाऱ्या आणखी एका चुकीच्या धोरणाचा उल्लेख करणे आवश्यक ठरेल. विद्यार्थ्यांना नव्या काव्याबरोबरच जुन्या काव्याचाही परिचय करून द्यावा हे भाषेच्या अध्यापनाचे एक उद्दिष्ट आहे. परंतु कोणत्या पातळीवर ? मराठी चौथीच्या विद्यार्थ्यांना या दृष्टिकोणानुसार वामनपंडितांचे 'अन्योक्तीकलाप' शिकविणे समर्थनीय ठरेल काय ? याच पुस्तकात 'मी तुम्हा दिसे जरि बाळ' या कवितेतील पुढील एक कडवे नमुन्यादाखल देतो--

> 'संमोह सारुनि दुरी मग त्या क्षणाला
> धर्मे दिली अनुमती रणि जावयाला
> श्री-कीर्ति-भूति-सु-यशान्वित तो कुमार
> शोभे रणात जणु केसरिचा किशोर'.

चवथ्या वर्गातील ज्या विद्यार्थ्यांना जोडाक्षरे देखील धड लिहिता येत नाहीत, त्यांचे नीट उच्चार करता येत नाही त्या विद्यार्थ्यांना अशा प्रकारच्या संस्कृतप्रचुर शब्दांनी काव्य शिकविणे कितपत योग्य आहे याचा अभ्यासकांनीच विचार करावा.

माझ्या मते वामन-मोरोपंतादि पंडित कवींचे संस्कृतप्रचुर व सामासिक शब्दांचा अतिरिक्त भरणा असलेले काव्य पूर्वमाध्यमिक वर्गातील विद्यार्थ्यांना देखील शिकवू नये. काव्याच्या अध्यापनाचा हेतू विद्यार्थ्यांमध्ये काव्याविषयी गोडी निर्माण करणे, त्यांच्या भावनांना आवाहन करून त्यांना आनंद देणे हा होय. संधी-समास शिकविणे, शब्दसंपदा वाढविणे व अन्वयार्थाच्या द्वारे मेंदू वळकट करणे हा नव्हे. असल्या वोजड व शब्दावडंबरित काव्यामुळे अभिरुची निर्माण होणे तर दूरच राहो, उलट काव्याविषयी अरुचीच निर्माण होण्याची शक्यता अधिक. जेव्हा विद्यार्थ्यांची शब्दसंपदा विकसित झाली असते व जेव्हा संस्कृत भाषेच्या अभ्यासाला प्रारंभ होतो अशा उत्तर माध्यमिक पातळीवरील किंचित परिपक्व अवस्थेत पंडिती काव्याचा अभ्यास करवून घेणे हा अधिक श्रेयस्कर दृष्टिकोण आहे.

विद्यार्थ्यांचे शब्दज्ञान वाढवावे हा भाषेच्या अध्यापनाचा हेतू आहे हे खरे. भाषा म्हणजे शब्दांचाच व्यापार ! परंतु ज्या शब्दांमधून विद्यार्थ्यांना काहीही अनुभूती येऊ शकत नाही, केवळ शब्दज्ञानच होते अशा शब्दज्ञानाचे ओझे त्यांच्यावर लादण्यात काय हशील ? अनुभूती व तदर्थक शब्द यांचे साहचर्य साधून भाषेचे अध्यापन केले तरच त्यातून विद्यार्थ्यांचा मानसिक विकास होऊ शकेल.

विद्यार्थ्यांच्या स्वाभाविक प्रवृत्ती—

विद्यार्थ्यांच्या मानसिक विकासाच्या अवस्थेसोबतच त्यांच्या त्या त्या वयातील प्रवृत्ती, अभिरुची व कल या गोष्टींचाही त्या त्या इयत्तेसाठी तयार करण्यात येणाऱ्या पुस्तकांच्या बाबतीत विचार केला पाहिजे. वर म्हटल्याप्रमाणे तत्त्वज्ञानपर व पारमार्थिक स्वरूपाचे काव्य—मग ते संतांचे असो, पंतांचे असो किंवा आधुनिक कवींचे असो, विद्यार्थ्यांना रुचत नाही. 'बीं'ची 'यमदूतास', टिळकांची 'लेकराची जिज्ञासा' या कविता फारशा कठिण नसल्या तरी चिंतनशील आहेत, रसोत्कट नाहीत व विद्यार्थ्यांच्या स्वाभाविक प्रवृत्तींना विशेष अनुकूलही नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांना आवडत नाहीत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काही कविता तर विद्यार्थ्यांच्या मानसिक प्रवृत्तींचा विचार करता अयोग्य व अनिष्ट म्हणाव्या लागतील. उदा० 'पोर खाटेवर मृत्युच्याच दारा' ही कविता पाचव्या किंवा सहाव्या वर्गाच्या पुस्तकात बहुतेक असते. इतक्या लहान वयाच्या विद्यार्थ्यांसमोर त्यांच्याच वयाच्या मुलाच्या मृत्यूचे अतीव दुःखद चित्र पुढे करणे मानसशास्त्राला धरून होईल काय ? यशवंतांची 'आई' व दत्तांची 'निज नीज माझ्या बाळा' या अत्यंत लोकप्रिय व बहुतेक सर्व पाठ्यपुस्तकांमधून समाविष्ट केलेल्या कवितांचाही याच दृष्टीने विचार करावयाला हवा. 'पोर खाटेवर मृत्युच्याच दारा' किंवा 'आई' या कविता जर भावनोत्कट पद्धतीने शिकवल्या तर वर्गात मुले रडू लागतात. ही रसनिष्पत्ती नव्हे--हे प्रत्यक्ष दुःख आहे, भीती आहे. या लहान, कोवळचा, हसणाऱ्या-बागडणाऱ्या मुलांना रडविणे हे खरोखर पाप आहे. त्यांना हसू द्या, खेळू द्या, हुंदडू द्या ! रडवता का ? 'निज नीज माझ्या बाळा' मध्ये रडू येण्याजोगे काही नाही, परंतु कवितेतील बाळाच्या आईच्या अंतःकरणाची वेदना व तिच्या मागील सामाजिक आशय लहान विद्यार्थ्यांना आत्मसात करणे कितपत शक्य आहे ? तसेच 'आईचा मृत्यू'--ह. ना आपटे ह्या धड्यात ६ व्या वर्गाच्या विद्यार्थ्यांना किंवा 'मृत्यूचे काव्य'—साने गुरुजी--या प्रौढांना तात्त्विक आनंद देणाऱ्या निबंधांत उत्तर माध्यमिक विद्यार्थ्यांना किती रस वाटेल याची कल्पनाच केलेली बरी. गोविंदाग्रजांच्या 'अल्लड प्रेमास' अशा निराश व जीवनाबद्दलच्या कडवट वृत्तींमधून जन्माला आलेल्या कविता विद्यार्थ्यांचीही जीवनाकडे पाहाण्याची निरोगी दृष्टी विकृत करतील. बरे या कवितेत ना भाषेचा नखरा ना कल्पनेचा विलास ! त्याऐवजी गडकऱ्यांच्या भाषासौंदर्याचे दर्शन घडविणाऱ्या इतर आणखी कविता सहज मिळू शकतील. तांब्यांच्या 'गुलाबी कोडे' या कवितेतील प्रेमीजनांच्या प्रेमाच्या अद्वैताची अनुभूती उत्तर माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांनाही येणे असंभव आहे. किंवा यशवंतांच्या 'जाहल्या तिन्हि सांजा' मधील पत्नीची हुरहुर सातव्या वर्गातील किती विद्यार्थ्यांच्या अंतःकरणाला चटका लावील ?

तात्पर्य, कविता अगर धडा कितीही उत्तम असला तरी तो त्या त्या वयातील विद्यार्थ्यांच्या मनःप्रवृत्तींना व अभिरुचीला धरून असेल तर त्याला त्या पाठ्यपुस्तकात स्थान द्यावे.

वयोमानपरत्वे विद्यार्थ्यांपुढे कसा प्रकारचे साहित्य ठेवण्यात यावे यासंबंधी काही सूचना व तशी काही उदाहरणे दिल्यास ही भूमिका अधिक चांगल्या रीतीने स्पष्ट होऊ शकेल.

प्राथमिक अवस्थेतील विद्यार्थ्यांसाठी नेमलेल्या कविता नादमधुर व धावत्या चालीच्या असाव्या, सोप्या व नित्यपरिचित विषयावरील असाव्या. 'विमान' (गोपीनाथ) 'न्याहारी' (ठोकळ) 'तर मग गट्टी कोणाशी' (तांबे) 'अम्ही तर जंगलची पाखरे' (गोरे) अशा कविता विद्यार्थ्यांना आवडतील व पचतील. पूर्व माध्यमिक अवस्थेमधील विद्यार्थ्यांच्याही कविता प्रामुख्याने गेयच असाव्यात. या वयातील विद्यार्थ्यांची मने वीररसात्मक कविता उदा. 'सावळचा व घोडेस्वार' (बा. भ. पाटील), 'फेकला तटाहुनी घोडा' (तिवारी) 'श्रावणमास' (बालकवी) 'प्रभात' (दत्त) यासारख्या निसर्गवर्णनपर तर 'पाहुणे', 'परटास' (अत्रे) सारख्या विडंबनपर कवितांमध्येअधिक रमतील. उलट उत्तर माध्यमिक अवस्थेतील विद्यार्थी 'गर्जा जयजयकार' (कुसुमाग्रज) सारख्या राष्ट्रीय; 'सागरास', 'माझे मृत्युपत्र' (सावरकर) यांसारख्या देशभक्तीच्या 'तुतारी' (केशवसुत) सारख्या समाजसुधारणावर 'सहानुभूती', 'बळी' (कुसुमाग्रज), 'गुन्हेगार' (कांत) 'त्यांचे राज्य उद्याचे' (पाडगावकर) अशा सामाजिक आशयपर; 'विश्वामित्रीच्या काठी' (दत्त) उषःकाल (कुसुमाग्रज) इत्यादी कल्पनाविलासपर; 'आई' (यशवंत) सारख्या भावनोत्कट कवितांचा आस्वाद घ्यायला अधिक तत्पर व तयार असतात. गद्याच्याही बाबतीत हेच धोरण ठेवता येईल. प्राथमिक अभ्यासक्रमाच्या पाठ्यपुस्तकांमध्ये पौराणिक व व ऐतिहासिक कथा, थोरपुरुषांच्या आठवणी, आसपासच्या सौंदर्यस्थळांची वर्णने अशा प्रकारचे धडे असावेत. विचारप्रवर्तक लेख व खोल सामाजिक आशय असलेल्या कथा वगळाव्या. पूर्वमाध्यमिक अवस्थेत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

किंचित वरच्या पातळीवरील कथा—उदा. 'बामन-भटजींची गाय' (साने गुरुजी); 'कुऱ्याचा पट्टा' (दोंडकर); 'श्यामची आई'मधील कथाभाग (साने गुरुजी); लेख—उदा. 'तीन गृहदेवता' (विनोबा); 'शपथ घ्या' (अत्रे); 'अभिमन्यूचा अवतार जन-कोजी शिंदे' (ओक); तळवलकर, साने गुरुजी आदींनी लिहिलेली थोर पुरुषांची चरित्रे वा आठवणी अशा लेखांची निवड व्हावी. तर उत्तरमाध्यमिक विद्यार्थ्यांसाठी 'कला—धोबिणीचे वैधव्य', 'वहाणा' (कुसुमावती देशपांडे); 'नासलेले अमृत मधुर झाले' (माटे); अशा सामाजिक आशयाच्या कथा; 'शेव-ग्याच्या शेंगा', 'वहिनींच्या बांगड्या', 'सुपारी' (य. गो. जोशी); अशा कौटुंबिक जिव्हाळ्याने ओथं-बलेल्या कथा; आगरकर, सावरकर, टिळक, सहस्रबुद्धे, विनोबा इत्यादींचे विचारप्रवर्तक निबंध; फडके-खांडेकर—काणेकरांचे लघुनिबंध; कालेलकर, दांडेकर आदींची काव्यपूर्ण प्रवासवर्णने या प्रकारच्या लेखांची निवड व्हावी.

विनोदी लेखांसही पाठ्यपुस्तकात जरूर स्थान असावे. परंतु बहुतेक पुस्तकांत श्री. कृ. कोल्हटकरांचेच विनोदी लेख दिसून येतात. कोल्हटकरांचे विनोद-प्रवर्तक म्हणून श्रेष्ठत्व मान्य करूनही चिं. वि. जोशी, कॅ. लिमये, शामराव ओक, पु. ल. देशपांडे आदी लेख-कांच्या विनोदी निबंधांची निवड करायला काय हरकत आहे?

वर उल्लेखिलेलेच धडे किंवा त्याच लेखकांच्या लेखांची निवड व्हावी असे माझे मुळीच म्हणणे नाही. ही निवड कशी व कोणत्या पातळीवर व्हावी हे दर्श-विण्यासाठी काही उदाहरणे फक्त दिली आहेत. साहित्याच्या प्रांगणात अनेक नवे नवे समर्थ लेखक व कवी उदयास येत आहेत. शारदेच्या दरबारात मोलाची भर घालीत आहेत. त्यांच्याही साहित्याची निवड साक्षेपी वृत्तीने करण्यास कसलाच प्रत्यवाय नसावा.

संपादन—संक्षेप

विविध वयांना व विविध प्रवृत्तींना अनुकूल अशा पाठांची निवड करीत असताना आणखी एक तत्त्व पाळावे लागते व ते म्हणजे संपादन—किंवा मूळ लेख अगर कविता यात काटछाट करणे, तिला संक्षिप्त स्वरूप देणे. श्रेष्ठ लेखकांच्या साहित्याचा परिचय करून देणे हा पाठ्यपुस्तकांचा महत्त्वाचा उद्देश आहे. परंतु कुठलाही लेखक विद्यार्थ्यांना झेपेल व पाठ्य-पुस्तकांत बसू शकेल अशा लांबीरुंदीचे उद्देशपूर्वक लेखन करीत नाही. त्यामुळे त्या लेखाचा अगर कवितेचा संक्षेप करणे आवश्यक ठरते. परंतु हा संक्षेप म्हणजे कशाही प्रकारे व लेखात कोठेही केलेली कापाकापी नव्हे. जो भाग कमी केल्यामुळे मूळ लेखाच्या किंवा कवितेच्या मध्यवर्ती कल्पनेला कोठेही बाध येणार नाही, अर्थहानी होणार नाही, कलात्मक सौंदर्याला धक्का पोचणार नाही व एकंदर परिणाम-कारकता कमी होणार नाही अशाच ठिकाणी हा संक्षेप अगर ही काटछाट करण्यात यावी, अन्यथा नव्हे. तसे जमत नसेल तर तो लेख, अगर ती कविता पाठ्य-पुस्तकात घेतली नाही तरी चालेल परंतु त्या लेखाला —कवितेला कोठेही कात्री लावून छिन्नविच्छिन्न करू नये. सुयोग्य संक्षेपाची एकदोन उदाहरणे देणे पुरेसे ठरेल. बी कवींची 'माझी कन्या' ही कविता पूर्व-माध्यमिक अगर उत्तरमाध्यमिक या कोणत्याही विद्यार्थ्यांना शिकविण्यास योग्य आहे. पण केव्हा? जर त्या कवितेतील मधले—पुरुषप्रकृतीसंबंधाचे तात्त्विक विवेचन गाळून टाकले तर! बरे हे विवेचन गाळ-ल्यास कवितेच्या रसवत्तेला मुळीच धक्का पोचत नाही. उलट ती अधिक सुलभ व रसोत्कट बनते. तेव्हा अशा संक्षेपाला प्रत्यवाय नाही. विनोबांचा 'तीन मुद्दे' हा निबंध पूर्वमाध्यमिक वर्गांसाठी नेमावयाचा असल्यास त्यातील शेवटचा गीतेतील तत्त्वज्ञानाची सांगड घालणारा तात्त्विक भाग वगळून टाकणे श्रेयस्कर ठरेल. कथांमध्ये व निबंधां-मध्येही असा संक्षेप करता येईल. परंतु मूळ आशयाला धक्का न लावता संक्षेप करणे ही अतिशय कठिण व कौशल्याची बाब आहे. लेखाची एकात्मता, स्वयंपूर्णता, व कलात्मकता जरा देखील विकृत झाल्यास हा संक्षेप हा कलाकृतीवर फार मोठा अन्याय करणारा ठरेल. तेव्हा हे कडक पथ्य सांभाळूनच लेखांचे वा कवितेचे संपादन करण्यात यावे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाङ्मय–परिचय

विद्यार्थ्यांना वाङ्मय शिकवायचे, त्यांना वाङ्मयाचे ज्ञान द्यायचे म्हटले म्हणजे वाङ्मयाच्या अनेकविध प्रकारांची — निबंध, लघुनिबंध, कथा, नाट्यप्रवेश, नाट्यछटा, रूपककथा, चरित्र–आत्मचरित्र, शब्दचित्र, प्रवासवर्णन, पत्रात्मक लेखन — ओळख करून त्यांच्या वैशिष्ट्यांचे दर्शन घडविणे हे ओघानेच येते. त्याचप्रमाणे मराठीतील श्रेष्ठ लेखकांचाही परिचय करून देण्याची आवश्यकता आहेच. या दृष्टीने शक्य तितके वाङ्मयप्रकार व शक्य तितके प्रातिनिधिक लेखक यांना पाठ्यपुस्तकात स्थान मिळावे. अर्थातच प्रत्येक पाठ्यपुस्तकात प्रत्येक प्रकार व प्रत्येक महत्त्वाचा लेखक आलाच पाहिजे असा अट्टाहास नसावा, तसे करणे शक्यही नाही. माध्यमिक शिक्षणाच्या एकंदर अभ्यासक्रमातून वाङ्मयाचे सर्वांगीण दर्शन घडविणे — बहुतेक सर्व प्रमुख लेखकांचा परिचय करून देणे हा उद्देश सफल व्हावा.

यासाठीच प्राचीन वाङ्मय व अर्वाचीन वाङ्मय या दोहोंचा अंतर्भाव पाठ्यपुस्तकात व्हावा. व एकंदर माध्यमिक शिक्षणातील अभ्यासक्रमातून वाङ्मयाचे ऐतिहासिक विकासाचे चित्र विद्यार्थ्यांपुढे स्पष्टपणे उभे राहावे. त्यात कालपरत्वे होत जाणाऱ्या बदलाची स्पष्ट कल्पना त्यांना यावी. मात्र हे सर्व धोरण अमलात आणत असतानाच वेचे व कविता यांची निवड विद्यार्थ्यांच्या मनोवस्थेला धरून करण्याच्या तत्त्वाकडे कदापि दुर्लक्ष होऊ देता कामा नये.

स्फुट उतारे

पाठ्यपुस्तकाच्या पृष्ठसंख्येलाही मर्यादा आहेतच. सगळ्याच लेखकांचे लेख व कविता त्यात घेणे शक्य नसते. ज्या लेखकांचे पूर्ण अगर संक्षेपित लेख देणे शक्य नसते त्यांच्या लेखांमधील उदात्त विचारवैभव प्रकट करणारे, भावनेने ओथंबलेले किंवा कल्पनाविलास व भाषासौंदर्याने नटलेले काही निवडक उतारे–परिच्छेद देणे उपयुक्त ठरू शकेल. याच पद्धतीने प्रसिद्ध कवींच्या निवडक काव्यपंक्तींचीही निवड करता येईल. मंगलवाचन या वि. स. खांडेकर व ग. ल. ठोकळ यांनी संपादन केलेल्या मालेत या पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. या योजनेमुळे पृष्ठे फारशी न वाढविताही विद्यार्थ्यांना अधिक प्रमाणात निरनिराळ्या लेखकांचा व कवींचा परिचय करून त्यांच्या लेखनवैशिष्ट्यांचे दर्शन घडविणे शक्य होईल. तसेच विचार व भावना प्रकटीकरणाचे व परिच्छेद–लेखनाचे शैलीदार नमुने अभ्यासण्याची उत्तम सोय होईल.

प्रादेशिक बोलींचा परिचय

विद्यार्थ्यांना मातृभाषेचे प्रमाण (Standard) स्वरूपच शिकविले जावे. साहजिकच पाठ्यपुस्तकांची निर्मितीही प्रमाण भाषेतच व्हावी. प्रमाण भाषेतील लेखांनाच त्यात प्राधान्य असावे. तरी देखील ज्या विशिष्ट प्रदेशामध्ये ते पुस्तक शिकविले जाणार असेल तेथील प्रादेशिक बोलीमध्ये लिहिलेला एखादा तरी लेख पाठ्यपुस्तकात असावा. जेणेकरून विद्यार्थ्यांना त्या प्रदेशातील बोलीचे, शब्दांचे, भाषावैशिष्ट्यांचे ज्ञान होईल. सर्वच प्रादेशिक बोलींचे ज्ञान देणे शक्य नसले तरी निदान ज्या विभागात विद्यार्थी जीवन जगतात, व्यवहार करतात त्या बोलीची तरी त्यांना माहिती असावी. जीवनव्यवहार व भाषा यांचा परस्परसंबंध लक्षात घेता व भाषा हे सामाजिक व्यवहाराचे माध्यम आहे हे विचारात घेता विद्यार्थ्यांना प्रादेशिक बोलीचा ढोबळ परिचय करून देणे आवश्यकच ठरेल.

भाषाभगिनींचा परिचय

मातृभाषेतील साहित्याचा परिचय विद्यार्थ्यांना करून देणे हे तर आपले उद्दिष्ट आहेच. परंतु त्याबरोबरच काही भाषाभगिनींमधील श्रेष्ठ साहित्यिक व साहित्यकृतींचा परिचय करून दिल्यास अन्य भाषांविषयीही विद्यार्थ्यांच्या मनात जिज्ञासा व अभिरुची निर्माण होण्याची शक्यता आहे. टागोर, शरच्चंद्र चॅटर्जी, प्रेमचंद आदींच्या काही सुंदर कथांचे झालेले उत्तम अनुवाद उत्तर माध्यमिक वर्गाच्या पाठ्यपुस्तकात घेता आले तर श्रेयस्करच ठरेल. याच भूमिकेवरून संस्कृत व इंग्रजी या भाषांमधील निवडक व अनुरूप उताऱ्यांचे अनुवाद पाठ्यपुस्तकात समाविष्ट करता येतील. मातृ-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भाषेबद्दल योग्य तो अभिमान व आदर विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावाच. परंतु त्याला दुरभिमानाचे अनिष्ट व संकुचित स्वरूप येऊ नये. अशी व्यापक व निर्मळ साहित्यदृष्टी निर्माण करण्यास इतर भाषांमधील साहित्यकृतींचा अभ्यास उपकारक ठरू शकतो.

सुयोग्य संस्कार

विद्यार्थ्यांच्या सद्विचारांचा व सदभिरुचीचा विकास होऊन त्यांचे मानसिक उन्नयन करणे, त्यांचा सांस्कृतिक स्तर उंचावणे हे वाङमयाच्या अध्ययन–अध्यापनाचे प्रमुख कार्य आहे. म्हणून ज्यातून विद्यार्थ्यांच्या मनावर सुयोग्य सामाजिक, राष्ट्रीय व नैतिक संस्कार होऊ शकतील अशाच साहित्याची निवड पाठ्यपुस्तकात झाली पाहिजे. 'कलेसाठी कला', 'कलेचे कार्य केवळ सौंदर्यदर्शन की नीतिबोध ?' 'कलाकृतीच्या श्रेष्ठकनिष्ठतेचा खरा निकर्ष कोणता ?' 'कलात्मक मूल्ये विरुद्ध सामाजिक वा नैतिक मूल्ये' इत्यादी प्रश्न आज साहित्यक्षेत्रात चर्चिले जात आहेत. परंतु या चर्चेशी आपल्याला व पाठ्यपुस्तकनिर्मात्याला कर्तव्य नाही. विद्यार्थ्यांची संस्कारक्षम व वाढाळू मने व त्यांवर साहित्याचा होणारा परिणाम या गोष्टी विचारात घेऊनच त्यांच्या पाठ्यपुस्तकांच्या अंतरंगाची घडण करावी लागेल. याचा अर्थ हे सर्व साहित्य उपदेशपर व बोधपर असावे असे नाही. पाठ्यपुस्तकांतून विद्यार्थ्यांना उपदेशाचे डोस देणे गैरच ! नीतिपाठ हाच उद्देश ठेवला तर उत्तमोत्तम साहित्यकृती वगळाव्याच लागतील. 'फुलराणी' सारख्या कवितेतून विद्यार्थ्यांच्या कोणत्या नैतिक प्रवृत्तींना चालना मिळेल ? परंतु या कवितेतून विद्यार्थ्यांच्या काव्याभिरुचीवर व सौंदर्यदृष्टीवर निश्चितच इष्ट ते संस्कार होण्याची शक्यता आहे. म्हणून अशा 'नैतिक' पातळीवरच साहित्याची स्वीकार्हता ठरविता येणार नाही. तरीही ज्या साहित्यातून विद्यार्थ्यांच्या अनिष्ट प्रवृत्ती जागृत होण्याची शक्यता आहे असे साहित्य कटाक्षाने वगळावे. विद्यार्थ्यांमध्ये एवढा 'कलाविवेक' निर्माण झालेला नसतो. तसेच वाङ्मयाचा आपण शैक्षणिक पातळीवर विचार करीत आहोत. त्यामुळे ज्यापासून विद्यार्थ्यांना कलात्मक आनंदाचा लाभ तर होईलच, परंतु शिवाय सोबतच सुप्त स्वरूपात— अप्रत्यक्ष रीतीने ज्या वाङमयाचे विद्यार्थ्यांवर सुसंस्कार होतील अशाच वाङमयाचा पाठ्यपुस्तकासाठी विचार व्हावा.

याच संदर्भात आणखीही एक सूचना द्यावीशी वाटते. व ती म्हणजे संकुचित, संप्रदायनिष्ठ, पूर्वग्रहदूषित असे लिखाण, वादग्रस्त लिखाण, बुद्धिभेद करणारे लिखाण, विद्यार्थ्यांसमोर ठेवू नये.

लेखक परिचय

ज्या लेखकाचा लेख व ज्या कवीची कविता पाठ्यपुस्तकासाठी निवडली असेल त्याचा लेखापूर्वी परिचय देण्याची प्रथा आहे व ती योग्यच आहे. प्रश्न आहे तो असा की हा परिचय कोणासाठी आहे व तो कसा असावा. विद्यार्थ्यांसाठी जर तो असला—व तो त्यांच्यासाठीच असावा—तर कोठल्याही वाङमयेतिहासात्मक व समीक्षात्मक पुस्तकात वापरल्या जाणाऱ्या प्रौढ व कठीण भाषेत तो नसावा. तसेच तो शक्यतोवर निवडलेल्या पाठाशी संबंधित असावा व त्यातूनच त्या लेखकाच्या लेखनवैशिष्ट्याचा व कार्याचा थोडक्यात परिचय करून देणारा असावा.

लेखकाचे चित्रही द्यायला हरकत नाही. परंतु ते स्पष्ट व स्वच्छ असावे.

टीपा

टीपांमध्ये कठीण शब्दांचे अर्थ, पौराणिक वा ऐतिहासिक संदर्भ, ज्या व्यक्तींचा लेखात उल्लेख आला असेल त्यांची माहिती व इतर अपरिचित कल्पनांचे स्पष्टीकरण असावे. परंतु अशा टीपा देतांनाही नीट विचार करावा. ज्या शब्दांचे अर्थ विद्यार्थ्यांना सहजासहजी समजू शकतात, मिळू शकतात अशा शब्दार्थांनी जागा अडविण्याचे कारण नाही. हेच इतर संदर्भांच्याही बाबतीत खरे आहे. पुष्कळदा सहजासहजी मिळणारे संदर्भ उगाचच दिले जातात व दुर्मिळ संदर्भ दिलेच जात नाहीत. उदा—मागे 'गद्यमाला' या पुस्तकात लो. टिळकांचा न्या. रानडे यांच्यावरील मृत्युलेख हा धडा होता. त्यात डॉ.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भाऊ दाजी, सार्वजनिक काका, शिवराम हरि साठे, रा. ब. नूलकर, सर रिचर्ड टेंपल, फीमेल हायस्कूल, औद्योगिक चळवळ, बुधवारवाड्याची आग, गायकवाड प्रकरण इत्यादी किती तरी उल्लेख होते. बरे, या सर्व व्यक्ती किंवा घटना ऐतिहासिक दृष्टीने ठळक किंवा महत्त्वाच्या नाहीत. न्या. रानडे यांच्या जीवनाच्या व त्या कालखंडाच्या संदर्भातच त्यांना महत्त्व आहे. ही सर्व माहिती सहजासहजी मिळत नाही. ती मिळविणे फार प्रयासाचे काम आहे. वास्तव अशा प्रकारची सर्व माहिती संपादकाने मिळवून ती टीपांमध्ये द्यायलाच हवी. प्री–युनिव्हर्सिटीसाठी नेमलेल्या 'मराठी गद्यगौरव' या पुस्तकात न. चिं. केळकरांचा 'काव्यदृष्टी' हा धडा होता. या धड्यात पौर्वात्य साहित्यातील अनेक लेखक, पुस्तके व त्यांतील पाने यांचे तर उल्लेख होतेच, परंतु पाश्चात्त्य वाङ्मयातीलही बटलरचे 'ह्युडिब्रास' पोपचे 'डन्सियड' यासारखे व शेक्सपियरच्याच नाटकातील जवळजवळ पंचवीसपेक्षा अधिक पात्रांचे उल्लेख होते. हा धडा शिकविणाऱ्याला शेक्सपियरच्या वाङ्मयाची सर्व माहिती मिळवावी लागे. तेव्हा अशा धड्यांच्या बाबतीत टीपांमध्ये ही सर्व माहिती देणे हे संपादकाचे काम आहे.

तसेच धड्यामध्ये काही अर्धवट वचने वा काव्यपंक्ती आल्यास त्यांचेही पूर्ण रूप दिले पाहिजे. उदा. 'ज्ञानदेवे रचिला पाया किंवा 'राजा वा कालस्य कारणम्' इत्यादी.

या सर्व टीपा संपादकानेच दिल्यावर मग शिक्षकाला काय तयारी करावी लागेल, त्याला सर्व आयतेच मिळेल, त्याने अभ्यास करू नये काय? असा मुद्दा उपस्थित होऊ शकतो. याला उत्तर हेच की अभ्यास करणे, तयारी करणे, माहिती मिळविणे हे शिक्षकाचे कर्तव्य आहेच. परंतु खेड्यापाड्यांमधील शिक्षकांना शाळेतच काय बाहेरही शब्दकोश, चरित्रकोश, इतिहास इत्यादी सोयी उपलब्ध नसतात. मग त्यांनी माहिती कशी मिळवावी? म्हणून टीपांची आवश्यकता!

शिक्षकांसाठी स्वतंत्र मार्गदर्शिका

पुष्कळदा विद्यार्थ्यांना काही संदर्भाची त्रोटक माहितीही पुरे होते. परंतु शिक्षकांना मात्र त्या त्या लेखकासंबंधी, त्याच्या वाङ्मयासंबंधी, त्यातील चर्चित विषयासंबंधी अधिक व अवांतरही माहिती असली पाहिजे. ही सर्व विद्यार्थ्यांसाठी नेमलेल्याच पाठ्यपुस्तकात कोंबण्याची गरज नाही. त्यासाठी शिक्षकांकरता त्या त्या पाठ्यपुस्तकावर स्वतंत्र, वेगळ्या, सविस्तर व परिपूर्ण अशा मार्गदर्शिका तयार करण्यात याव्या. नवोदित, विषयाचा नीट अभ्यास नसणाऱ्या व खेड्यापाड्यातील शिक्षकांना त्या फारच उपयुक्त ठरतील व अनेक शिक्षकांकडून अपुऱ्या ज्ञानामुळे घडणारे प्रमाद तरी टळतील.

स्वाध्याय

पाठांच्या शेवटी स्वाध्यायही देण्याची पद्धती आहे. हे देण्यास हरकत नाही. परंतु त्यातही ठराविकपणा वा तोच तोचपणा नसावा. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला, व सृजनशीलतेला वाव मिळेल असे हे स्वाध्याय असावेत. अशा काही स्वाध्यायांची उदाहरणे 'सृजनशील उद्दिष्टांचा विकास' या लेखात दिली आहेत.

याबरोबरच त्या त्या धड्यावर विद्यार्थ्यांनी अधिक काय वाचावे याची सविस्तर व निश्चित माहिती स्वाध्यायात द्यावी. पुस्तक, निबंध वा कवितेचे नाव, व लेखक यांचा माहितीत समावेश व्हावा.

पाठ्यपुस्तकाचे बहिरंग

पाठ्यपुस्तकाच्या अंतरंगाचा आतापर्यंत विचार केला. पुस्तकाचे बहिरंग ही अंतरंगाच्या तुलनेत कमी महत्त्वाची बाब असली तरी ती उपेक्षणीय खचित नव्हे. म्हणून पुस्तकाचे बाह्य स्वरूप आकर्षक करून देणे हे संपादकाचे कर्तव्यच आहे. बहिरंगात आकर्षक व सचित्र मुखपृष्ठ, उत्तम व निर्दोष छपाई, अक्षरांचा टाईप, इतर सजावट व बांधणी या प्रमुख घटकांचा समावेश होतो. प्राथमिक शाळांच्या पुस्तकांचा टाईप मोठा, आकारही मोठा असावा व त्यात चित्रमयता अधिक असावी. वरच्या वर्गांच्या पुस्तकात क्रमाने

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या गोष्टींचे प्रमाण कमी व्हावे. परंतु पुस्तकांचे एकंदर स्वरूप, सजावट, छपाई व बांधणी ही आकर्षक व टिकाऊ असावीच. या दृष्टीने आपल्या विभागीय शिक्षणमंडळाने प्रकाशित केलेली मराठीची पाठ्यपुस्तके कमालीची अनाकर्षक आहेत असे खेदाने म्हणावे लागते. या उलट हल्ली प्रचारात असलेली विदर्भात चालू असलेली प्राथमिक शाळांची 'बालभारती' ही पुस्तके पाहावीत. म्हणजे हा फरक सहज व स्पष्टपणे लक्षात येऊ शकेल.

पाठ्यपुस्तके कोणी तयार करावीत—

पाठ्यपुस्तके कोणी तयार करावीत हाही एक महत्त्वाचा प्रश्न आहे. या बाबतीत एवढेच म्हणता येईल की कोण्याही एक दोन व्यक्तींनी—मग त्या मान्यवर का असेना—ती संपादित करू नयेत. तर शिक्षणशास्त्रज्ञ, साहित्याभ्यासक, मराठीच्या अध्यापनाचे तज्ज्ञ, अनुभवी व अधिकारी शिक्षक यांनी मिळून ती तयार करावीत. असा प्रयत्न झाला तरच प्रत्येक वेच्याचे व कवितेचे विविध दृष्टिकोनातून परीक्षण होईल व मगच तिची पाठ्यपुस्तकाच्या दृष्टीने योग्यायोग्यता ठरविली जाईल. व पुस्तक एकांगी दृष्टिकोनाने डागळले न जाता त्याला जास्तीत जास्त निर्दोष व शास्त्रीय स्वरूप प्राप्त होईल व त्यातून मराठीच्या अध्यापनाची उद्दिष्टे अधिकाधिक प्रमाणात साध्य होण्याची शक्यता निर्माण होईल.

साभार पोच

पुस्तकाचे नाव	लेखक	प्रकाशक	किंमत
१ केशवसुत (२ प्रती, हिंदी, इंग्रजी)	श्री. प्रभाकर माचवे	साहित्य अकादमी, नवी दिल्ली	
२ विद्वान सोवती की कुशल गृहिणी ?	श्री. बा. सं. गडकरी	सेवा प्रकाशन, अमरावती २	३–००
३ शुद्ध कसे लिहावे ?	प्रा. भाऊ मांडवकर सौ. सिंधू मांडवकर	"	००–५०
४ स्मृतींची चाळता पाने	श्री. मा. पं. शिखरे	पाप्युलर प्रकाशन, मुंबई ३४	८–००
५ अत्रे वाङ्मय दर्शन	श्री. बाळ सामंत	भारतीय ग्रंथभवन मुंबई, १४	२०–००
६ मेंदी	इंदिरा	मौज प्रकाशन गृह, मुंबई ४	३–५०
७ श्री शिल्लक	श्री. शं. वा. चिरमुले		७–००
८ अंतरा	श्री. के. वा. भोळे	"	१२–५०
९ चित्रमय विज्ञान	विज्ञान विहारी	वोरा अँड कंपनी, मुंबई २	१–२५
१० अमेरिकेची राजकीय पद्धती	अनु. विद्याधर पुंडलिक		५–००
११ घर	सौ. शैलजा राजे		२–५०
१२ संदेश	सौ. श्यामला शिरोळकर		२–००
१३ एका शास्त्रज्ञाचे स्वप्न	कुमुदिनी रांडिकर	"	२–००
१४ जागृती	श्री. वा. ल. वझे	शिव प्रकाशन, बांदिवडे, गोवा	२–५०
१५ सर्वांगयोग-दर्शन	डॉ. पु. ह. संत उर्फ सिद्धाचार्य डॉ. सर्वांगानंद चैतन्य	सर्वांगयोग प्रकाशन मंडळ, नागपूर	५–००

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुस्तक परीक्षण

राज्याभिषेक

[श्री. व्यंकटेश वकील. प्रकाशक–भारतीय ग्रंथ भवन, मुंबई १४; मूल्य रु. ३–५०]

मराठी रंगभूमीवर आजवर अनेक विषय आकाराला आले. त्यांनी कधी सामाजिक कथांचा तर कधी पौराणिक आख्यानांचा आश्रय घेतला. ऐतिहासिक कथानकांनीही तीवर पदार्पण केले नाही असे नाही. काही तर चांगलीच तळपली. पण ऐतिहासिक कथानकात जवळजवळ संपूर्ण राजनैतिक विषयाचाच विलास करीत येणारे हे एक अपूर्व नाटक !

भारतीय राजनीतीचे अनेक प्रणेते प्रख्यात आहेत. भगवान् मनु, गुरुवर्य शुक्राचार्य, महात्मा विदुर इत्यादी अनेक नावे घेता येतील, पण मूर्तिमंत राजनीती म्हणजे कौटिल्यच ! अर्थात् चाणक्य. ह्याविषयी पुराणांतरी उल्लेख आहेत. आणि अनेक आख्यायिका प्रचलित आहेत. पण त्याचा स्वतःचाच आज विद्वन्मान्य झालेला ग्रंथ जो 'अर्थशास्त्र' तो सर्वांत महत्त्वाचा पुरावा आहे. आणि दुसरा म्हणजे त्याचा शिष्य चंद्रगुप्त !

लेखकाच्या शब्दात सांगायचे म्हणजे, "तेवीस शतकांपूर्वी मगधात प्रत्यक्ष घडलेल्या राज्यक्रांतीवरील दोन प्रमुख पात्रे—चाणक्य आणि चंद्रगुप्त इतिहासाला परिचित आहेत. या दोघा सामर्थ्यसंपन्न पुरुषांनी ती क्रांती घडवून आणली आणि भारताच्या इतिहासाला एक नवे राष्ट्रीय वळण लावले." भारतासारख्या सुवर्णभूमीवर सर्वांचेच डोळे असणे हे जवळजवळ नैसर्गिक आहे अशीच इतिहासाची साक्ष आहे. चाणक्य चंद्रगुप्ताचा काळही अपवादात्मक नव्हता. जगज्जिगीषु शिकंदराने राज्यलालसेने आक्रमण आरंभिले असा तो काळ ! अशा वेळीही आर्यभूमीला सुसंरक्षित ठेवून राष्ट्रीयत्व जागृत ठेवण्याचा मान चाणक्य-चंद्रगुप्त ह्या गुरुशिष्य जोडीकडे जातो. ह्या जोडीतल्या चंद्रगुप्ताचा राज्याभिषेक हा जसा तेव्हा महान् उत्सव होता तसाच तो आजही रंगभूमीवर — आणि जनमनोभूमीवर ठरावा !

ह्या विषयावर पूर्वी लिहिले गेलेले नाटक म्हणजे विशाखदत्ताचे (संस्कृत) 'मुद्राराक्षसम्.' विशाखदत्ताने निर्माण केलेले कथानक एखाद्या सुरस व चमत्कारिक कथेप्रमाणे असून त्यात अर्थशास्त्रातील कूटनीतीचा प्रणेता चाणक्य पूर्णतया प्रकट होतो. हेर–प्रतिहेरांचे जाळे, उच्च अंतिम ध्येयाच्या पूर्तीसाठी सकृद्दर्शनी दुष्ट वाटणाऱ्या योजना, मानवी मनाचे सखोल अवलोकन व त्याबरहुकूम केलेली उपाययोजना इत्यादी 'कौटिल्य' हे नामाभिधान प्राप्त झालेल्या चाणक्याची वैशिष्ट्ये जशी त्यात दृग्गोचर होतात तशीच चंदनदासासारखा असामान्य उदात्त अंतःकरणाचा सामान्य वैश्य निर्माण करणाऱ्या थोर नाटककाराची प्रतिमाही प्रत्ययाला येते.

त्याच प्रसंगाचा आधार घेणारे हे नाटक असल्यामुळे ते नाटक वाचकालाही विसरणे शक्य नाही तेव्हा लेखकाला कसे शक्य होणार ? तरीही 'राज्याभिषेक' नाटकात श्री. वकीलांची नवनिर्मिती आहे. थोडा नव्याने उजेडात आलेला इतिहासही—सेल्यूकसच्या मुलीशी झालेला चंद्रगुप्ताचा विवाह—आलेला आहे तोही नाटककाराच्या रचनाचातुरीची साक्ष देतो.

एका ऐतिहासिक कालखंडाला साकार करणाऱ्या ह्या नाटकास आधुनिक रंगभूमीस पेलतील इतक्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मोजक्या पात्रांत बसवून उत्कंठा आणि मनोरंजन ह्यांना सत्यप्रसंगाच्या चौकटीत उतरविण्याचे नाटककाराचे कसब वाखाणण्यासारखे आहे. भाषाही काळास व पात्रांना अनुरूप अशी प्रौढ असली तरी नाट्योचित आहे हे विशेष आहे.

नवनिर्माणक्षम प्रतिभेला हाती आलेले कथानक जसेच्या तसे समोर ठेवणे शक्य नाही. पण केलेले फेरफार ज्या काही विशिष्ट हेतूंनी केले जातात ते प्रकट तर असावेतच. शिवाय त्याकरवी कथानकाला सौंदर्य लाभावे किंवा पात्राच्या स्वभावविशेषांवर प्रकाश पडावा. त्या दृष्टीने नाटकात केलेले दोन फरक मनाला पटत नाहीत.

मुद्राराक्षसात निपुणक ह्या चाणक्याच्या गुप्तचराला अमात्य राक्षसाची मुद्रिका सापडते. ह्यात हेराने केलेला प्रयत्न स्पष्ट आहे. पण 'राज्याभिषेका'त गौरीला ती मुद्रिका यदृच्छेने सापडल्यासारखी वाटते. चाणक्यासारख्या महामती महामंत्र्याची योजना यदृच्छेने सापडलेल्या आंगठीवर आधारित असावी हा प्रसंग तितकासा रोचक नाही.

दुसरा बदल म्हणजे चाणक्य-चंद्रगुप्तांमधील कृतककलह ! दोन्हीही नाटकात ह्या कृतककलहाचा उद्देश एकच — शत्रूने गाफील होणे. पण मुद्राराक्षसात ज्या प्रसंगावरून हा कृतककलह झालेला दाखविला आहे त्यात कौटिल्याचे चातुर्य असून चंद्रगुप्ताची प्रतिष्ठा अबाधित राहावी — किंबहुना वृद्धिंगत व्हावी असा यत्न आहे. त्याउलट 'राज्याभिषेका'त होते. रणक्षेत्रावरून अर्जुनविषादाने पळून आलेल्या चंद्रगुप्तावरोबर चाणक्याचा मतभेद होतो. रणक्षेत्रावर आलेल्या आणि राष्ट्रहितविरोधी भावालाही अवध्य समजण्याइतका चंद्रगुप्त उदात्त होता असे दाखविण्याचा उद्देश असला तरी तो इतिहासाशी व त्याच्या स्वभावाशी कितपत सुसंगत आहे आणि हे सर्व कृतककलहाचे बीज पेरणाऱ्या चाणक्याच्या महामतीला कितपत श्लाघ्य आहे हे प्रश्न उरतातच. असो. गालबोटाने ज्याप्रमाणे कामिनीचे सौंदर्य आणखीच वाढते त्याप्रमाणेच असले एखाददुसरे मतभेद !

भारतीय इतिहासात सुवर्णपर्वाची निर्मिती करणारी चाणक्यचंद्रगुप्तांची जोडी मराठी प्रेक्षकांसमोर प्रत्ययकारी प्रभावाने आणल्याबद्दल श्री. वकील अभिनंदनार्हच आहेत.

—अ. गो. देशपांडे

—जग, विचारवंताला प्रहसन तर भावनाप्रधान माणसाला शोकांत नाटक वाटतं.

—धर्माचा पाया नसलेलं शिक्षण केवळ बुद्धिमान सैतानांचीच निर्मिती करतं.

—मौन हीच खरी शक्ती आहे; बाकी सर्व दुर्बलता आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय—

'मरणं प्रकृतिः शरीरिणां विकृतिर्जीवितमुच्यते' ह्या अजोक्तीतील पहिलाच भाग सर्वांशाने खरा आहे. दुसऱ्या भागाचा अर्थ अजविलापाच्या संदर्भातच लावायला हवा. 'अनित्यं खलु जीवितम्' हेच खरे. परंतु सकल मानवजातीच्या संस्कृतीची घडण त्याच 'अनित्य' कालात घडलेली आहे. अर्थात् 'युवैव धर्मशीलः स्यात्' हे ज्यांनी पाळले असेल त्यांनीच ती जडण घडण केली आहे. नागपूरचे सांस्कृतिक संचित ज्यांनी आपल्या आचरणाने, तपाने आणि अभ्यासाने जतन करून ठेवले आणि जोपासले अशा काही निवडक मान्यवरांत कै. अप्रबुद्ध – पाळेकर ह्यांचे निश्चित उच्च स्थान आहे. वसिष्ठ-विश्वामित्रासारखे कै. अप्रबुद्ध आणि कै. भाऊजी दप्तरी ह्यांसारखे महामुनि नागपूर शहराला लाभले हे त्याचे भाग्य आहे. विषयाला स्पर्श करण्यासंबंधीचे दोघांचे मार्ग जरी विभिन्न असले तरी पारंपरिक समजुतीला डोळस करण्याच्या बाबतीत दोघेही प्रयत्नशील राहिले. एवढे अवश्य नमूद करायला हवे. कै. भाऊजीनंतर कै. अप्रबुद्धांच्या मृत्यूमुळे नागपूर एका थोर तत्वजिज्ञासूला मुकले आहे.

× × ×

उर्वरित आयुष्यात आपल्या समकालीन कवी बी प्रमाणे कवी नागेश ह्यांची 'कविता' 'मूक' झाली. समकालिनांत नागेशांची कविता प्रिय होती ह्याचे दाखले सापडतात. 'नागेश वागीश्वरी' संस्कृतप्रचुर आणि डौलदार होती. नागेशांचा देहांत दोन महिन्यांपूर्वी झाला. त्यांच्यावरचा प्रा. भवानीशंकर पंडितांचा लेख प्रत्यक्ष कवीबद्दल उत्सुकता वाढविणारा ठरावा. नागेशांची प्रतिभा मूक झाली असेल पण त्यांची रसिकता शेवटपर्यंत जागृत होती असे प्रा. पंडितांच्या लेखावरून वाटते.

× × ×

'झाले बहु होतिल बहु परंतु या सम हा' ही उक्ती सार्थ करणारे नारायणराव कालवश झाले. आठवणी ठेऊन गेले आहेत. स्त्रियांच्या भूमिका कोणी कराव्यात हा प्रश्न आज सुटला आहे. पण कृत्रिमाने निसर्गाला नक्कल करावयास लावावी हा चमत्कार नारायणरावांच्या स्त्री-भूमिका करून गेल्या आहेत. गाण्याचा आणि अभिनयाचा ते मानदंड ठरले जावेत एवढी प्रतिष्ठा त्यांनी जाणीवपूर्वक परिश्रम करून संपादन केली. प्रत्येक नवीन पिढीला नवे नट आणि नवे गायक मिळतात. पण गणनाप्रसंगी कनिष्ठिकेनंतर अनामिका 'सार्थवती' करण्याचा मान फक्त त्यांचाच !

× × ×

जुन्या पिढीतील (जन्म १८७८) एक श्रेष्ठ अमेरिकन कवी कार्ल संडबर्गच्या मृत्यूचे वर्तमान आले आहे. 'शिकागो' शहरावर कविता लिहून कवीने त्या शहरास न्यूयॉर्कच्या तोडीस आणून बसवले. आधीची कविता अटलांटिकच्या किनाऱ्यामोवती रुंजी घालणारी होती. तिला मध्यपश्चिमेस त्याने पाचारिले. वॉल्ट व्हिटमनच्या धर्तीची पण त्यापासून वेगळी अशी कविता लिहिण्याबद्दल तो प्रसिद्ध आहे. तो स्वतः एलिनॉय शहराचा. त्या शहराचा श्रेष्ठ नागरिक अब्राहम लिंकन. लिंकनचे चरित्र तो न लिहिता तर नवल ! कारण तो लिंकनचा महान भक्त होता. त्याच्या स्मृतीला प्रणाम.

जाता जाता प्रयागदत्त शुक्लांच्या मृत्यूची वार्ता आली. नागपुरातील सांस्कृतिक जीवनाला आणखी एक धक्का. मराठी-हिंदी स्नेहभावाचे प्रतीक. नागपूरकर भोसल्यांचा त्यांनी इतिहास लिहावा हे योग्यच होते. हिंदी साहित्य संमेलनाच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

× × ×

एक प्रकारे संपादकीय म्हणजे त्या महिन्यांतील 'मासिकाचा' मृत्युलेखच. ते बघा, हे बघा, किंवा आठवण करून देतो, असे त्यामुळेच येते. हे संपादकीय मृत्युलेखांतून मृत्युलेखातच विराम पावले आहे.

मा. नी. गलगलीकर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस, वि. सा. संघ

सांस्कृतिक समिती

महाकवी कालिदास स्मृतिदिनानिमित्त, दि. ८ जुलै ६७ रोजी सायं. ७ वाजता, श्री. शा. रा. साधू आणि श्री. मा. नी. गलगलीकर यांची भाषणे झाली.

'श्रीकृष्ण–द्वैपायन व्यासरचित आद्यसंशोधित गीता' या विषयावर डॉ. सर्वांगानंद चैतन्य ऊर्फ पु. ह. सन्त यांची दि. १५, १६ आणि १७ जुलै ६७ रोजी न्या. मू. भवानीशंकर नियोगी यांच्या अध्यक्षतेखाली तीन व्याख्याने झाली.

भेट

'महाराष्ट्र टाईम्स' चे संपादक श्री. द्वा. भ. कर्णिक यांनी दि. २ जुलै ६७ रोजी सायं. ७ वा. वि. सा. संघाला भेट दिली.

सत्कार

सुप्रसिद्ध समाजसेवक श्री. मा. ज. कानेटकर यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त त्यांचा दि. २७ जुलै रोजी सायं. ५–३० वा. सत्कार करण्यात आला. यावेळी संघाध्यक्ष प्रा. वा. कृ. चोरघडे यांनी श्रीफल आणि पुष्पहार अर्पण करून सत्कार केला. या प्रसंगी आचार्य दादासाहेब धर्माधिकारी यांचे भाषण झाले. चहापानानंतर कार्यक्रम संपला.

नटसम्राट श्री. बालगंधर्व शोकसभा (नाट्यशाखा)

नटसम्राट श्री. नारायणराव राजहंस ऊर्फ बालगंधर्व यांच्या निधनानिमित्त गुरुवार दि. २७ जुलै रोजी सायं. ६-३० वाजता धनवटे रंगमंदिरात शोकसभा आयोजित करण्यात आली. यावेळी श्री. मा. ज. कानेटकर, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. नरहर जोशी, श्री. श्री. गु. ऊर्फ बाळासाहेब अण्णिगेरी, श्री. दि. ब. पंडित, प्रा. रू. पां. पाजणकर, श्री. ब. ना. एकबोटे, डॉ. वि. भि कोलते आणि श्री. सखारामपंत जोशी यांची भाषणे झाली.

यावेळी नटसम्राट बालगंधर्वांच्या प्रतिमेला विविध संस्थांतर्फे पुष्पहार घालण्यात आले.

नटसम्राट बालगंधर्व यांचे छायाचित्र, कलाकेन्द्र समितीचे संयोजक श्री. वसंतराव टिकेकर, यांनी तयार करून दिले.

या कार्यक्रमाचे वेळी नटसम्राट बालगंधर्व यांच्या नाट्यपदांच्या ध्वनिमुद्रिका लावण्यात आल्या.

श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालय आणि अभ्यासमंडळ वार्ता

नटसम्राट बालगंधर्व यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी बालगंधर्वांवर लिहिलेल्या वाङ्मयाचे एक छोटेसे प्रदर्शन गडकरी सभागृहात आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनात, बालगंधर्वांसंबंधी ग्रंथ, विविध लेख व वृत्तपत्रांचे खास श्रद्धांजली अंक प्रदर्शनात ठेवण्यात आले होते. याकरिता नागपूर विद्यापीठ वाचनालयाचे प्रमुख ग्रंथपाल श्री. वसंतराव कुळकर्णी यांचे अमूल्य सहकार्य लाभले.

आजीव सभासद

सौ. उषा माधवराव देशमुख, (नागपूर) ह्या संस्थेच्या आजीव सभासद झाल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शाखावृत्त

कारंजा शाखा

कारंजा शाखेच्या समासदांची सभा दि. २१-५-६७ रोजी झाली. या सभेत इ. स. ६७-६८ करिता कार्यकारी मंडळाकरिता समासद निवडण्यात आले.

अध्यक्ष—श्री. वि. वि. ठाकूर, समासद—श्री. अं. रं. असोलकर, श्री. वा. दे. घुमाळे, श्री. बा. सा. बारगळ, सौ. कमल द. खजूरकर, केंद्रीय कार्यालयाकडून—श्री. अ. मो. चवरे.

वणी शाखा

वणी शाखा—समासदांची दि. १५ जुलै ६७ रोजी समा होऊन इ. स. ६७-६८ करिता कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

अध्यक्ष—प्राचार्य राम शेवाळकर, कार्याध्यक्ष—श्री. भालचंद्र पुराणिक, सरचिटणीस—प्रा. शां. सी. कवडे, चिटणीस—श्री. माधव सरपटवार, श्री. मधुकरराव राजूरकर.

सभासद—प्रा. वामनराव देशपांडे. श्री. अण्णासाहेब पसारकर, श्री. मुलचंदजी जैन, श्री. नारायणराव सरपटवार, श्री. मधुकरराव खानझोडे, श्री. बाबुराव कांबळे, श्री. रामदास सरमुकदम, श्री. वामनराव ठाकरे.

विदर्भ साहित्य संघ : परीक्षा समिती

केंद्राधिकाऱ्यांना विनंती

(१) आगामी सप्टेंबर १९६७ सत्रातील परीक्षा शनिवार, दिनांक २३ आणि रविवार दिनांक २४ सप्टेंबर १९६७ ला घेण्यात येतील.

(२) नवीन केंद्र सुरू करण्यासाठी कमीतकमी २५ विद्यार्थी परीक्षेस बसविले तरच केंद्र-मान्यता देण्यात येईल असा समितीचा परिपाठ आहे. परीक्षार्थी आवेदन-पत्र-मूल्य २५ पैसे प्रमाणे केंद्रातच अवांतर खर्चासाठी राखून ठेवावे. आवेदन-पत्र-मूल्य आणि केंद्र पुरस्कार यांचा सामान्यत: विनियंग टपालखर्च, प्रमाणपत्र-वितरण व पारितोषिक-वितरण यांसाठी करावा. केवळ परीक्षार्थ्यांचे निर्धारित शुल्कच केंद्रीय कार्यालयाकडे पाठवावे.

(३) आपण आपल्या केंद्रातून दिनांक ३० ऑगस्ट ६७ पर्यंत परीक्षार्थी आवेदन-पत्रे सशुल्क भरून घेऊन, केंद्रीय कार्यालयाकडे ५ सप्टेंबर १९६७ चे आत पाठविण्याची दखल घ्यावी. तदनंतर आलेली आवेदनपत्रे स्वीकृत करण्यात येणार नाहीत.

प्रत्येक सत्रात जास्तीतजास्त विद्यार्थी परीक्षेस बसवून आम्हास सहकार्य देऊन उपकृत करावे, ही विनंती.

भवदीय
ग. स. देशपांडे
संचालक
परीक्षा समिती,

दि. १ ऑगस्ट १९६७

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ प्रकाशन—

प्रयोगक्षम मराठी नाटके

ले.—डॉ. मु. श्री. कानडे, पुणे किमत रु. १५-००

आरंभापासून आजपर्यंत जी नाटके रंगभूमीवर आली त्यांच्यासंबंधी थोडक्यात माहिती देणारा मराठीतील पहिलाच सूचिग्रंथ.

" मराठी वर्णोच्चार-विकास "

लेखक—प्राचार्य डॉ. व. हृ. अग्निहोत्री

(मराठी भाषेच्या अभ्यासकांसाठी उपयुक्त संशोधनार्थ)

पृष्ठे-४६८ डेमी जाड टिकाऊ बांधणी मूल्य रु. १६-००

मराठी भाषा शिकणाऱ्या व्यक्तींसाठी अत्यंत उपयुक्त पुस्तक—

हिन्दी

मराठी-भाषा-प्रवेशिका

लेखिका

मालतीबाई श्रीखंडे, एम्. ए., बी. टी.

मूल्य रु. १-२५

वि. सा. संघाचे प्रकाशन—मागणी करा.

मुद्रक : पां. ना. बनहट्टी, नारायण मुद्रणालय, घनतोली, नागपूर १.

प्रकाशक : मा. नी. गलगलीकर, विदर्भ सहित्य संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, सीतावर्डी, नागपूर १.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ